Sati

मराठी

V. P. GAURKAR

F&D-A - Bombay Dm.

भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# औषधव्यवसाय अधिनियम, १९४८

(१९४८ चा अधिनियम क्रमांक ८)

[१ जुलै, १९८० रोजी अमलात असल्याप्रमाणे]

# The Pharmacy Act, 1948

## (Act No. 8 of 1948)

**[As in force on the 1st July, 1980]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०'.

२. 'विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६'.

३. 'औषधव्यवसाय (विशोधन) अधिनियम, १९५९' (१९५९ चा २४).

४. 'औषधव्यवसाय (विशोधन) अधिनियम, १९७६' (१९७६ चा ७०).

# औषधव्यवसाय अधिनियम, १९४८

## कलमांचा क्रम

### प्रकरण १ ले

### प्रास्ताविक

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. निर्वचन.

### प्रकरण २ रे

### भारतीय औषधव्यवसाय परिषद

३. केंद्रीय परिषदेची घटना व रचना.
४. केंद्रीय परिषदेचे निगमन.
५. केंद्रीय परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष.
६. निवडणुकांची पद्धती.
७. पदावधी व निमित्तवशात् रिकाम्या होणाऱ्या जागा.
८. कर्मचारीवर्ग, पारिश्रमिक व भत्ते.
९. कार्यकारी समिती.
९क. इतर समित्या.
१०. शिक्षणविषयक विनियम.
११. शिक्षणविषयक विनियम राज्यांना लागू करणे.
१२. मान्य पाठ्यक्रम व परीक्षा.
१३. मान्यता काढून घेणे.
१४. या अधिनियमाचा ज्यांवर विस्तार असेल अशा राज्यक्षेत्रांबाहेर प्रदान केल्या जाणाऱ्या अर्हता.
१५. घोषणांची पद्धती.
१५क. केंद्रीय नोंदवही.
१५ख. केंद्रीय नोंदवहीत नोंदणी करणे.
१६. निरीक्षक.
१७. माहिती सादर करावयाची.
१७क. हिशेब व लेखापरीक्षा.
१८. विनियम करण्याची शक्ती.

### प्रकरण ३ रे

### राज्य औषधव्यवसाय परिषदा

१९. राज्य परिषदांची घटना व रचना.
२०. आंतरराज्यीय करार.
२१. संयुक्त राज्य परिषदांची रचना.
२२. राज्य परिषदांचे निगमन.
२३. राज्य परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष.
२४. निवडणुकांची पद्धती.
२५. पदावधी व निमित्तवशात् रिकाम्या होणाऱ्या जागा.
२६. कर्मचारीवर्ग, पारिश्रमिक व भत्ते.
२६क. पाहणी.
२७. कार्यकारी समिती.
२८. माहिती सादर करावयाची.

### प्रकरण ४ थे

### औषध व्यवसायींची नोंदणी

२९. नोंदवही तयार करणे व ठेवणे.
३०. पहिली नोंदवही तयार करणे.
३१. पहिल्या नोंदवहीत नोंद होण्यासाठी अर्हता.
३२ नंतरच्या नोंदणीसाठी अर्हता.
३२क. विवक्षित व्यक्तींच्या नोंदणीसाठी विशेष उपबंध.

३२ख. विस्थापित व्यक्ती, स्वदेशी परतलेल्या व्यक्ती आणि इतर व्यक्ती यांच्या नोंदणीबद्दलचे विशेष उपबंध.
३३. नोंदणीकरता आलेल्या अर्जांची छाननी.
३४. नूतनीकरण फी.
३५. अतिरिक्त अर्हतांची नोंद करणे.
३६. नोंदवहीतून नाव काढून टाकणे.
३७. नोंदवहीत नाव पुन्हा दाखल करणे.
३८. अन्य अधिकारितेला आडकाठी.
३९. नोंदणी प्रमाणपत्रांची दुसरी प्रत देणे.
४०. नोंदवहीची छपाई आणि त्यातील नोंदीचे पुरावा म्हणून महत्त्व.

## प्रकरण ५ वे

### संकीर्ण

४१. नोंदणी झाली असल्याचा खोटा दावा करण्याबद्दल दंड.
४२. नोंदणी न झालेल्या व्यक्तींनी औषधे तयार करून देणे.
४३. नोंदणी प्रमाणपत्र स्वाधीन करण्यास चुकणे.
४४. फीचा काही अंश केंद्रीय परिषदेस देणे.
४५. चौकशी आयोगाची नियुक्ती.
४६. नियम करण्याची शक्ती.

# औषधव्यवसाय अधिनियम, १९४८

(१९४८ चा अधिनियम क्रमांक ८)[1]

[४ मार्च, १९४८]

औषधविषयक पेशाचे विनियमन करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, औषधविषयक पेशा व व्यवसाय यांचे विनियमन करण्यासाठी अधिक चांगली व्यवस्था करणे आणि त्यासाठी औषधव्यवसाय परिषदा घटित करणे समयोचित आहे;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

## प्रकरण १ ले

### प्रास्ताविक

१ (१) या अधिनियमास 'औषधव्यवसाय अधिनियम १९४८' असें म्हणता येईल. — संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ

[2][ (२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे. ]

(३) तो ताबडतोब अंमलात येईल,—मात्र ३ रे, ४ थे व ५ वे ही प्रकरणे एखाद्या विशिष्ट राज्यात, ते राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे यावाबतीत नियत करील अशा [3]* * * दिनांकापासून परिणामक होतील :

[4][ परंतु, १ नोव्हेंबर, १९५६ रोजी झालेल्या राज्यपुनर्रचनेद्वारे क्षेत्रीय बदल घडून आल्यामुळे ३, ४ व ५ ही प्रकरणे एखाद्या राज्याच्या काही भागातच परिणामक झाली असतील तर, राज्य शासन तशाच रीतीने नियत करील अशा दिनांकापासून त्या राज्याच्या उर्वरित भागात उक्त प्रकरणे परिणामक होतील. ]

२ या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,— — निर्वचन.

(क) "करार" याचा अर्थ, कलम २० खाली करण्यात आलेला करार असा आहे ;

(ख) "मान्य" याचा अर्थ, केंद्रीय परिषदेने कलम १२ किंवा कलम १४ खाली मान्य केलेले असा आहे;

[5][ (ग) "केंद्रीय परिषद" याचा अर्थ, कलम ३ खाली घटित केलेली 'भारतीय औषधव्यवसाय परिषद' असा आहे;

(घ) "केंद्रीय नोंदवही" याचा अर्थ, केंद्रीय परिषदेने कलम १५क खाली ठेवलेली औषध-व्यवसायींची नोंदवही असा आहे ;

(घक) "कार्यकारी समिती" याचा अर्थ, संदर्भानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे, केंद्रीय परिषदेची किंवा राज्य परिषदेची कार्यकारी समिती असा आहे;

(ङ) "भारतीय विद्यापीठ" याचा अर्थ, 'विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६' (१९५६ चा ३) याच्या कलम ३ च्या अर्थानुसार जे विद्यापीठ आहे असे एखादे विद्यापीठ असा आहे आणि त्यात केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्रस्थापित केलेल्या ज्या संस्था, केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा इतर कोणत्याही संस्था समाविष्ट आहेत;]

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन याकरिता पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १९४७, भाग ५, पृष्ठ ४६९, आणि प्रवर समितीच्या अहवालाकरिता पहा, कित्ता-१९४८, भाग ५, पृष्ठ ६.

हा अधिनियम, दादरा व नगरहवेली या क्षेत्रास १९६३ चा विनियम ६-कलम २ व अनुसूची एक यांद्वारे, पाँडिचेरी क्षेत्रास १९६३ चा विनियम ७-कलम ३ व अनुसूची एक यांद्वारे, गोवा, दमण व दीव या क्षेत्रांस १९६३ चा विनियम ११-कलम ३ व अनुसूची द्वारे व लखदीव क्षेत्रास १९६५ चा विनियम ८-कलम ३ व अनुसूची यांद्वारे लागू केला.

महाराष्ट्र, गुजरात, म्हैसूर व राजस्थान या राज्यांना हा अधिनियम लागू करताना त्यात एस. ओ. २८१४, दिनांक १४ ऑगस्ट, १९६४ द्वारे आपरिवर्तन केले. पहा—गॅझेट ऑफ इंडिया, १९६४, असाधारण, भाग दोन, विभाग ३ (दोन), पृष्ठ ७१७.

तामिळनाडू राज्याला हा अधिनियम लागू करताना त्यात 'मद्रास विधि अनुकूलन (केंद्रीय अधिनियम) आदेश १९५७' आणि 'मद्रास विधि अनुकूलन (केंद्रीय अधिनियम) आदेश, १९६१' यांद्वारे आपरिवर्तन केले.

२. १९५९ चा अधिनियम २४-कलम २ द्वारे पोटकलम (२) ऐवजी हा मजकूर घातला (१, मे १९६० रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम २ द्वारे हा मजकूर गाळला (१, मे १९६० रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता—कलम २ द्वारे हा मजकूर घातला (१, मे १९६० रोजी व तेव्हापासून).

५. १९७६ चा अधिनियम ७०-कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

¹[ (च्) "वैद्यक व्यवसायी" याचा अर्थ,—

(एक) 'भारतीय वैद्यकीय पदवी अधिनियम, १९१६' (१९१६ चा ७) याच्या कलम ३ खाली विनिर्दिष्ट किंवा अधिसूचित केलेल्या किंवा 'भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम, १९५६' (१९५६ चा १०२) याच्या अनुसूच्यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाने प्रदान केलेली अर्हता धारण करणारी ; किंवा

(दोन) आधुनिक शास्त्रीय वैद्यक प्रणालीनुसार व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींच्या नोंदणीसाठी असलेल्या राज्याच्या वैद्यकीय नोंदवहीत नोंदलेली किंवा नोंदणी होण्यास पात्र असलेली; किंवा

(तीन) उपखंड (एक) किंवा उपखंड (दोन) च्या कक्षेत नसतानादेखील या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, जी व्यक्ती आधुनिक शास्त्रीय वैद्यक प्रणालीनुसार व्यवसाय करणारी व्यक्ती असल्याचे शासनाने याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून त्याद्वारे घोषित केले आहे अशी, राज्याच्या वैद्यकीय नोंदवहीत नोंदलेली; किंवा

(चार) 'दंतवैद्य अधिनियम, १९४८' (१९४८ चा १६) याखाली राज्याच्या दंतवैद्य नोंदवहीत नोंदलेली किंवा नोंदणी होण्यास पात्र असलेली ; किंवा

(पाच) जी व्यक्ती पशुवैद्यकीय व्यवसाय करीत असून राज्य शासनाने मान्य केलेली अर्हता धारण करीत आहे ती,

व्यक्ती असा आहे;]

(छ्) "विहित" याचा २ ऱ्या प्रकरणातील अर्थ, कलम १८ खाली केलेल्या विनियमांद्वारे विहित केलेले आणि इतरत्र त्याचा अर्थ कलम ४६ खाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

²[ (ज्) "नोंदवही" याचा अर्थ, ४ थ्या प्रकरणाखाली तयार केलेली व ठेवलेली औषधव्यवसायींची नोंदवही असा आहे;

(झ्) "नोंदलेला औषधव्यवसायी" याचा अर्थ, ज्या व्यक्तीचे नाव त्या त्या काळी ती ज्या राज्यात राहात असेल किंवा औषधविषयक पेशा किंवा धंदा चालवत असेल त्या राज्याच्या नोंदवहीत त्या त्या काळी नोंदलेले आहे, ती व्यक्ती असा आहे ;

(ञ्) "राज्य परिषद" याचा अर्थ, कलम १९ खाली घटित केलेली 'राज्य औषधव्यवसाय परिषद' असा आहे व त्यामध्ये कलम २० खाली एखाद्या करारानुसार घटित केलेल्या एखाद्या 'संयुक्त राज्य औषधव्यवसाय परिषदे'चा अंतर्भाव आहे ;

(ट्) "विद्यापीठ अनुदान आयोग" याचा अर्थ, 'विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६' (१९५६ चा ३) याच्या कलम ४ खाली घटित करण्यात आलेला 'विद्यापीठ अनुदान आयोग' असा आहे.]

## प्रकरण २ रे

### भारतीय औषधव्यवसाय परिषद

केंद्रीय परिषदेची घटना व रचना.

३. केंद्र शासन, होईल तितक्या लवकर, पुढील सदस्यांची मिळून बनलेली एक केंद्रीय परिषद घटित करील, ते सदस्य असे :—

(क्) ज्याच्या द्वारे औषधशास्त्रातील पदवी किंवा पदविका प्रदान केली जाते अशा एखाद्या भारतीय विद्यापीठाच्या किंवा त्याच्याशी संलग्न असलेल्या महाविद्यालयाच्या अध्यापकीय कर्मचारी-वर्गातील व्यक्तींमधून ³[ विद्यापीठ अनुदान आयोगाने ] निवडलेले सहा सदस्य—त्यांच्यामध्ये, औषध रसायनशास्त्र, औषधनिर्मितिशास्त्र, भेषजविज्ञान व औषधिगुणविद्या यांपैकी प्रत्येक विषयातील किमान एकेक अध्यापक असेल ;

(ख्) केंद्र शासनाने नामनियुक्त केलेले सहा सदस्य–त्यांपैकी किमान ³[ चार ] व्यक्ती ह्या औषधनिर्मितिशास्त्र किंवा औषध रसायनशास्त्र यामधील पदवी किंवा पदविका धारण करणाऱ्या किंवा त्यामधील व्यवसाय करणाऱ्या असतील;

(ग्) भारतीय वैद्यकीय परिषदेच्या सदस्यांनी आपल्यातून निवडून दिलेला एक सदस्य;

(घ्) महा संचालक, आरोग्य सेवा, (पदसिद्ध) किंवा जर एखाद्या सभेला उपस्थित राहण्यास तो असमर्थ असेल तर, त्यावेळी उपस्थित राहण्यास त्याने लेखी प्राधिकृत केलेली व्यक्ती ;

⁴[ (घ्घ्) भारताचा औषधनियंत्रक, (पदसिद्ध) किंवा जर एखाद्या सभेला उपस्थित राहण्यास तो असमर्थ असेल तर, त्यावेळी उपस्थित राहण्यास त्याने लेखी प्राधिकृत केलेली व्यक्ती;

(ङ्) संचालक, केंद्रीय औषध प्रयोगशाळा, पदसिद्ध ;]

---

१. १९५९ चा अधिनियम २४-कलम ३ द्वारे खंड (च्) ऐवजी हा खंड घातला (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम ४ द्वारे घातले (१ मे १९६० रोजी व तेव्हापासून).

३. १९७६ चा अधिनियम ७०-कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता—कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[1][ (च) विद्यापीठ अनुदान आयोगाचा एक प्रतिनिधी आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा एक प्रतिनिधी;]

(छ) प्रत्येक[2] * * * राज्याचे प्रतिनिधित्व करणारा, प्रत्येक राज्य परिषदेच्या सदस्यांनी [1][ आपल्यामधून ] निवडून दिलेला एकेक सदस्य—असा सदस्य हा नोंदलेला औषधव्यवसायी असेल;

(ज) प्रत्येक[2] * * * राज्याचे प्रतिनिधित्व करणारा, [1][ त्या ] राज्य शासनाने नामनियुक्त केलेला एकेक सदस्य—असा सदस्य हा [1]* * * नोंदलेला औषधव्यवसायी असेल:

[3][परंतु, 'औषधव्यवसाय (विशोधन) अधिनियम, १९७६' हा ज्या दिनांकास अंमलात येईल त्या दिनांकापासून पाच वर्षांपर्यंत, प्रत्येक संघ राज्यक्षेत्राचे शासन, त्या संघ राज्यक्षेत्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी खंड (छ) खाली सदस्य निवडून देण्याऐवजी, कलम ३१ खाली नोंदणीस पात्र असलेल्या व्यक्तीची नामनियुक्ती करील.]

[4]* * * * * * * *

केंद्रीय परिषदेचे निगमन.

४. कलम ३ खाली घटित केलेली परिषद हा स्थावर व जंगम अशी दोन्ही प्रकारची संपत्ती संपादन करण्याच्या व धारण कारण्याच्या शक्तीसह, उत्तराधिकाराची निरंतर परंपरा व सामाईक मोहोर असलेला 'भारतीय औषधव्यवसाय परिषद' या नावाचा निगमनिकाय असेल आणि त्या नावाने तो दावा लावील व त्याच्याविरुद्ध दावा लावण्यात येईल.

केंद्रीय परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष.

५. (१) केंद्रीय परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची, उक्त परिषदेचे सदस्य आपल्यामधून निवड करतील.

[5]* * * * * * * *

(२) [6][ अध्यक्ष ] किंवा उपाध्यक्ष हा त्या नात्याने जास्तीत जास्त पाच वर्षेपर्यंत ते पद धारण करील,—मात्र हा पदावधी त्याच्या केंद्रीय परिषदेच्या सदस्यत्वाच्या मुदतीपलीकडे लांबणार नाही, पण त्याचे केंद्रीय परिषदेचे सदस्यत्व चालू असले पाहिजे या शर्तीवर तो फेरनिवडणुकीस पात्र असेल:

[4][ परंतु, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून ज्या मुदतीसाठी तो निवडून आला असेल ती संपूर्ण मुदत समाप्त होण्यापूर्वी केंद्रीय परिषदेचा सदस्य म्हणून त्याचा पदावधी समाप्त होत असेल तर, तो केंद्रीय परिषदेचा सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यास अगर पुन्हा नामनियुक्त केला गेल्यास, अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या पदावर तो ज्या मुदतीसाठी निवडून आला असेल त्या संपूर्ण मुदतीपर्यंत तो ते पद धारण करण्याचे चालू ठेवील.]

निवडणुकांची पद्धती.

६. या प्रकरणाखालील निवडणुका विहित रीतीने घेण्यात येतील, आणि अशा कोणत्याही निवडणुकीसंबंधात कोणताही तंटा उद्भवला तर, तो केंद्र शासनाकडे निर्णयार्थ सोपवण्यात येईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

पदावधी व निमित्तवशात् रिकाम्या होणाऱ्या जागा.

७. (१) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, [9]* * * * नामनियुक्त केलेला किंवा निवडून आलेला सदस्य त्याच्या नामनियुक्तीच्या किंवा तो निवडून आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांची मुदत किंवा त्याच्या उत्तराधिकाऱ्यास रीतसर नामनियुक्त करण्यात येईपर्यंतची किंवा निवडून देण्यात येईपर्यंतची मुदत यांपैकी जी अधिक असेल त्या मुदतीपर्यंत पद धारण करील.

(२) नामनियुक्त केलेला किंवा निवडून आलेला सदस्य कोणत्याही वेळी, अध्यक्षास उद्देशून लिहिलेल्या स्वाक्षरित लेखाद्वारे आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊ शकेल, आणि तदनंतर अशा सदस्याची जागा रिकामी होईल.

(३) नामनियुक्त केलेला किंवा निवडून आलेला सदस्य, केंद्रीय परिषदेच्या लागोपाठच्या तीन बैठकींना केंद्रीय परिषदेच्या मते पुरेशी असेल अशा सबबीशिवाय अनुपस्थित राहिला तर, किंवा जर तो कलम ३-खंड (क), (ग) किंवा (छ) याखाली निवडून आलेला असून तो भारतीय वैद्यकीय परिषदेच्या अध्यापकीय कर्मचारीवर्गाचा सदस्य किंवा, प्रकरणपरत्वे, नोंदलेला औषधव्यवसायी असण्याचे बंद झाले तर, त्याची जागा रिकामी झाली असल्याचे मानण्यात येईल.

---

१. 'विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६' द्वारे "भाग क" हे शब्द गाळले.
२. 'विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६' द्वारे "अशा प्रत्येक" या शब्दांऐवजी हा शब्द घातला.
३. १९५९ चा अधिनियम २४-कलम ५ द्वारे हे परंतुक गाळले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).
४. १९७६ चा अधिनियम ७०-कलम ३ द्वारे घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).
५. कित्ता—कलम ३ द्वारे गाळले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).
६. कित्ता—कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).
७. कित्ता—कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी) व तेव्हापासून).
८. कित्ता—कलम ४ द्वारे जादा दाखल केले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).
९. कित्ता—कलम ५ द्वारे गाळले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(४) केंद्रीय परिषदेतील निमित्तवशात् रिकामी झालेली जागा ही, नव्याने नामनियुक्ती करून किंवा, प्रकरणपरत्वे, निवडणूक घेऊन त्याद्वारे भरण्यात येईल, आणि रिकामी जागा भरण्यासाठी नामनियुक्त करण्यात आलेली किंवा निवडून देण्यात आलेली व्यक्ती ज्या सदस्याची जागा घेईल त्याची नामनियुक्ती किंवा निवड जितक्या मुदतीकरता झाली होती तिच्यापैकी उर्वरित मुदतीपर्यंतच फक्त ती व्यक्ती पद धारण करील.

(५) केंद्रीय परिषदेने केलेल्या कोणत्याही कृतीला, केंद्रीय परिषदेमध्ये एखादी जागा रिकामी होती किंवा तिच्या घटनेत कोणतीही उणीव होती एवढ्याच केवळ कारणावरून आक्षेप घेता येणार नाही.

(६) केंद्रीय परिषदेचे सदस्य पुनर्नामनियुक्तीस किंवा फेरनिवडणुकीस पात्र असतील.

[१][ कर्मचारीवर्ग पारिश्रमिक व भत्ते.]

[१][ ८. केंद्रीय परिषद—

(क) एखाद्या निबंधकाची नियुक्ती करील व तो त्या परिषदेचा सचिव म्हणून काम पाहील आणि, त्या परिषदेने तसे ठरवल्यास तिचा कोषाध्यक्ष म्हणूनही तो काम पाहू शकेल;

(ख) त्या परिषदेला या अधिनियमाखालील आपली कामे पार पाडणे शक्य व्हावे म्हणून आवश्यक असतील असे अन्य अधिकारी व सेवक यांची नियुक्ती करू शकेल;

(ग) निबंधकाने, किंवा कोणताही इतर अधिकारी किंवा सेवक याने आपले कर्तव्य यथोचित रीत्या पार पाडावे यासाठी, त्या परिषदेला आवश्यक वाटेल अशी प्रतिभूती त्याच्याकडून मागवून घेऊ शकेल;

(घ) केंद्र शासनाची पूर्वमंजुरी घेऊन,—

(एक) त्या परिषदेचा अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि इतर सदस्य यांना द्यावयाचे पारिश्रमिक व भत्ते,

(दोन) त्या परिषदेचे अधिकारी व सेवक यांचे वेतन व भत्ते आणि इतर सेवा-शर्ती,

ठरवू शकेल.]

कार्यकारी समिती.

९. (१) केंद्रीय परिषद, होईल तितक्या लवकर, एक कार्यकारी समिती घटित करील व अध्यक्ष (हा कार्यकारी समितीचा सभापती असेल) आणि उपाध्यक्ष, (पदसिद्ध) आणि केंद्रीय परिषदेने आपल्या सदस्यांमधून निवडून दिलेले अन्य पाच सदस्य मिळून ती बनलेली असेल.

(२) कार्यकारी समितीचा सदस्य हा त्या नात्याने, केंद्रीय परिषदेचा सदस्य म्हणून त्याचा पदावधी संपेपर्यंत पद धारण करील, पण त्याचे केंद्रीय परिषदेचे सदस्यत्व चालू राहिल्यास तो फेरनिवडणुकीस पात्र असेल.

(३) या अधिनियमाद्वारे कार्यकारी समितीला प्रदान करण्यात आलेल्या शक्ती व तिच्याकडे सोपवण्यात आलेली कर्तव्ये यांव्यतिरिक्त ती समिती, विहित करण्यात येतील अशा शक्ती वापरील व अशी विहित कर्तव्ये पार पाडील.

[२][ इतर समित्या.]

[२][ ९क. (१) केंद्रीय परिषद स्वतःला आवश्यक वाटतील अशा सर्वसाधारण किंवा विशेष प्रयोजनांसाठी आणि ती विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे जास्तीत जास्त पाच वर्षांच्या कालावधीसाठी, आपल्या सदस्यांमधून इतर समित्या घटित करू शकेल आणि ज्या व्यक्ती केंद्रीय समितीच्या सदस्य नाहीत अशा व्यक्तींना तेवढ्याच कालावधीसाठी अशा समित्यांचे सदस्य म्हणून स्वीकृत करून घेऊ शकेल.

(२) अशा समित्यांच्या सदस्यांना द्यावयाचे पारिश्रमिक व भत्ते केंद्र शासनाच्या पूर्वमंजुरीने केंद्रीय परिषदेकडून निश्चित करण्यात येतील.

(३) अशा समित्यांपुढील कामकाज हे, या अधिनियमाखाली करण्यात येतील अशा विनियमांस अनुसरून चालवण्यात येईल.]

शिक्षणविषयक विनियम.

१०. (१) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, केंद्रीय परिषदेला, केंद्र शासनाच्या मान्यतेच्या अधीनतेने, औषधव्यवसायी म्हणून अर्ह होण्यास आवश्यक असलेला शिक्षणाचा किमान दर्जा विहित करणारे 'शिक्षणविषयक विनियम' म्हणून संबोधण्यात येणारे विनियम करता येतील.

(२) विशेषतः व पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, शिक्षणविषयक विनियमांमध्ये पुढील गोष्टी विहित करता येतील—

(क) परीक्षेसाठी प्रवेश मिळण्यापूर्वी करावयाच्या अभ्यासाचे व प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचे स्वरूप व कालावधी;

(ख) मान्य पाठ्यक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरवावयाची उपकरणे व सोयी;

(ग) परीक्षेचे विषय व त्यांमध्ये प्राप्त करावयाचा दर्जा;

(घ) परीक्षांकरता प्रवेश मिळण्याबाबतच्या अन्य कोणत्याही शर्ती.

---

१. १९७६ चा अधिनियम ७०-कलम ६ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता— कलम ७ द्वारे घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(३) शिक्षणविषयक विनियम व त्यामध्ये नंतर केलेली सर्व विशोधने यांच्या प्रारूपाच्या प्रती, केंद्रीय परिषदेकडून सर्व राज्य शासनांना पुरवल्या जातील आणि शिक्षणविषयक विनियम किंवा, प्रकरण-परत्वे, त्यातील कोणतेही विशोधन पोटकलम (१) खाली मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे सादर करण्यापूर्वी, केंद्रीय परिषद, उपरोक्ताप्रमाणे प्रती पुरवल्यापासून तीन महिन्यांच्या आत कोणत्याही राज्य शासनाकडून आलेले अभिप्राय विचारात घेईल.

(४) शिक्षणविषयक विनियम, शासकीय राजपत्रात व केंद्रीय परिषद निदेशित करील अशा अन्य रीतीने प्रकाशित करण्यात येतील.

(५) कार्यकारी समिती, शिक्षणविषयक विनियमांच्या परिणामकारकतेसंबंधी केंद्रीय परिषदेस वेळोवेळी अहवाल सादर करील आणि त्यासंबंधात आपणांस योग्य वाटतील अशी विशोधने करण्याविषयी ती केंद्रीय परिषदेकडे शिफारस करू शकेल.

शिक्षणविषयक विनियम राज्यांना लागू करणे.

११. ३ऱ्या प्रकरणाखाली राज्य परिषद घटित करण्यात आल्यानंतर आणि राज्य परिषदेचा विचार घेतल्यानंतर कोणत्याही वेळी राज्य शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, शिक्षणविषयक विनियम त्या राज्यात परिणामक होतील असे घोषित करता येईल :

परंतु, अशी कोणतीही घोषणा करण्यात आलेली नसेल तर, शिक्षणविषयक विनियम हे राज्य परिषद घटित करण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन वर्षे संपताच त्या राज्यात परिणामक होतील.

मान्य पाठ्यक्रम व परीक्षा.

१२. (१) [१]* * * राज्यातील जे कोणतेही प्राधिकरण औषधव्यवसायींसाठी पाठ्यक्रम चालवते त्याला पाठ्यक्रमास मान्यता मिळवण्यासाठी केंद्रीय परिषदेकडे अर्ज करता येईल, आणि केंद्रीय परिषद, स्वतःला जी चौकशी करणे योग्य वाटेल अशी चौकशी करून नंतर, उक्त पाठ्यक्रम हा शिक्षणविषयक विनियमांना अनुरूप आहे याबद्दल तिची खात्री झाली तर, उक्त पाठ्यक्रम हा औषधव्यवसायींसाठी असलेल्या मान्य परीक्षेकरता प्रवेश मिळण्याच्या प्रयोजनार्थ मान्य पाठ्यक्रम असल्याचे घोषित करील.

(२) [१]* * * राज्यातील जे कोणतेही प्राधिकरण औषधशास्त्रातील परीक्षा घेते त्याला परीक्षेस मान्यता मिळवण्यासाठी केंद्रीय परिषदेकडे अर्ज करता येईल, आणि केंद्रीय परिषद, स्वतःला जी चौकशी करणे योग्य वाटेल अशी चौकशी करून नंतर, उक्त परीक्षा ही शिक्षणविषयक विनियमांना अनुरूप आहे याबद्दल तिची खात्री झाली तर, उक्त परीक्षा ही या अधिनियमाखाली औषधव्यवसायी म्हणून नोंदणी होण्यासाठी अर्ह होण्याच्या प्रयोजनार्थ मान्य परीक्षा असल्याचे घोषित करील.

(३) जे प्राधिकरण मान्य पाठ्यक्रम चालवते किंवा मान्य परीक्षा घेते असे [१]* * * राज्यांमधील प्रत्येक प्राधिकरण, कोणते पाठ्यक्रम व प्रशिक्षणक्रम पुरे करावयाचे आणि कोणती परीक्षा द्यावयाची त्यासंबंधी, असे पाठ्यक्रम व परीक्षा कोणत्या वयाला पुऱ्या करावयाच्या त्यासंबंधी, आणि सर्वसाधारणपणे अशा पाठ्यक्रमांच्या व परीक्षांच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या गोष्टी यासंबंधी केंद्रीय परिषद वेळोवेळी मागवील अशी माहिती पुरवील.

मान्यता काढून घेणे.

१३. (१) एखादा मान्य पाठ्यक्रम किंवा मान्य परीक्षा ही शिक्षणविषयक विनियमांशी अनुरूप राहिलेली नाही असे कार्यकारी समितीने केंद्रीय परिषदेस कळवले तर, त्या पाठ्यक्रमास किंवा, प्रकरण-परत्वे, परीक्षेस दिलेली जाहीर मान्यता काढून घेण्याचा प्रश्न विचारात घेण्याचा आपला इरादा असल्याबद्दल केंद्रीय परिषद संबंधित प्राधिकरणास नोटीस देईल, आणि उक्त प्राधिकरण, अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, त्यास यासंबंधात जे अभिवेदन करावयाचे असेल असे अभिवेदन राज्य शासनामार्फत केंद्रीय परिषदेकडे पाठवील.

(२) संबंधित प्राधिकरणाकडून आलेले कोणतेही अभिवेदन आणि राज्य शासनाला त्यावर जे अभिप्राय देणे योग्य वाटले असेल ते अभिप्राय विचारात घेतल्यानंतर, केंद्रीय परिषदेला, विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी तो पाठ्यक्रम पूर्ण केल्यासच किंवा प्रकरणपरत्वे, ती परीक्षा उत्तीर्ण झाल्यासच तो पाठ्यक्रम किंवा ती परीक्षा मान्य असल्याचे मानण्यात येईल असे घोषित करता येईल.

या अधिनियमाचा ज्यांवर विस्तार असेल अशा राज्यक्षेत्रांबाहेर प्रदान केल्या जाणाऱ्या अर्हता.

१४. [३][ज्यांवर या अधिनियमाचा विस्तार आहे अशा राज्यक्षेत्रांच्या] बाहेर एखाद्या प्राधिकरणाने प्रदान केलेल्या औषधशास्त्रातील कोणत्याही अर्हतेमुळे आवश्यक ते कौशल्य व ज्ञान यांची पुरेशी हमी मिळते अशी जर केंद्रीय परिषदेची खात्री झाली तर, तिला अशी अर्हता ही, या अधिनियमाखाली नोंदणी होण्यासाठी अर्ह होण्याच्या प्रयोजनार्थ मान्य अर्हता असल्याचे घोषित करता येईल, आणि स्वतःला पुरेशी वाटतील अशी कारणे असल्यास त्या कारणांस्तव तिला केव्हाही, अशी अर्हता विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी किंवा नंतर प्रदान केलेली असेल तरच [४][केंद्रीय परिषद विनिर्दिष्ट करील अशा इतर कोणत्याही जादा शर्ती असल्यास त्यांच्या अधीनतेने,] ती मान्य असल्याचे मानले जाईल असे घोषित करता येईल :

परंतु, अशी अर्हता धारण करणारी [२][भारताचा नागरिक] सोडून अन्य कोणतीही व्यक्ती ज्या राज्यात किंवा देशात अर्हता प्रदान करण्यात आली असेल त्या राज्याचा किंवा देशाचा कायदा व प्रथा

---

१. 'अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे "भारताच्या" हा शब्द गाळला.

२. कित्ता—द्वारे मूळ शब्दांऐवजी घातले.

३. 'विधि अनुकूलन आदेश (क्रमांक ३), १९५६' द्वारे "भाग क राज्ये आणि भाग ख राज्ये यांच्या" याऐवजी हा मजकूर दाखल केला.

४. १९७६ चा अधिनियम ७०-कलम ८ द्वारे हा मजकूर घातला (१ सप्टेंबर १९७६ रोजी व तेव्हापासून).

यांनुसार, अशी अर्हता धारण करणाऱ्या मूळच्या भारतीय व्यक्तींना औषधविषयक पेशा पत्करण्याची व तो व्यवसाय करण्याची मुभा नसेल तर, ती नोंदणीकरता अर्ह आहे असे मानले जाणार नाही.

घोषणांची पद्धती. १५. कलम १२, कलम १३ किंवा कलम १४ खालील सर्व घोषणा केंद्रीय परिषदेच्या सभेत संमत झालेल्या ठरावाद्वारे करण्यात येतील, आणि त्या शासकीय राजपत्रात प्रसिद्ध होताच परिणामक होतील.

केंद्रीय नोंदवही. [१][ १५क. (१) केंद्रीय परिषद, 'केंद्रीय नोंदवही' या नावाची औषधव्यवसायींची एक नोंदवही विहित रीतीने ठेवण्याची व्यवस्था करील, आणि राज्याच्या नोंदवहीत त्या त्या काळी नोंदलेल्या व्यक्तींची नावे अशा नोंदवहीत अंतर्भूत असतील.

(२) प्रत्येक राज्य परिषद, प्रत्येक वर्षाच्या एक एप्रिल या तारखेनंतर शक्य तितक्या लवकर, राज्याच्या नोंदवहीच्या पाच प्रती केंद्रीय परिषदेस पुरवील, आणि प्रत्येक राज्य परिषदेचा निबंधक हा राज्याच्या नोंदवहीत वेळोवेळी घालण्यात आलेली भर व तीमध्ये केलेली इतर विशोधने अविलंबे केंद्रीय परिषदेस कळवील.

(३) केंद्रीय नोंदवही केंद्रीय परिषदेने दिलेल्या आदेशांस अनुसरून ठेवणे, तीत वेळोवेळी सुधारणा करणे व ती भारताच्या राजपत्रात प्रसिद्ध करणे हे केंद्रीय परिषदेच्या निबंधकाचे कर्तव्य असेल.

(४) केंद्रीय नोंदवही ही 'भारतीय पुरावा अधिनियम, १८७२' (१८७२ चा १) यात अभिप्रेत असल्याप्रमाणे, सार्वजनिक दस्तऐवज असल्याचे मानण्यात येईल आणि भारताच्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्यानुसार नोंदवहीची प्रत सादर करून ती नोंदवही शाबीत करता येईल.]

[१][ केंद्रीय नोंदवहीत नोंदणी करणे.] [१][ १५ख. केंद्रीय परिषदेचा निबंधक, राज्याच्या नोंदवहीत एखाद्या व्यक्तीची नोंदणी झाल्याचे वृत्त मिळाल्यावर तिचे नाव केंद्रीय नोंदवहीत दाखल करील.]

निरीक्षक. १६. (१) कार्यकारी समितीला, या प्रकरणाच्या प्रयोजनांकरता तिला आवश्यक वाटतील इतके निरीक्षक नियुक्त करता येतील.

(२) निरीक्षकाला—

(क) मान्य पाठ्यक्रमाची सोय असलेल्या कोणत्याही संस्थेची पाहणी करता येईल;

(ख) कोणत्याही मान्य परीक्षेच्या वेळी उपस्थित राहाता येईल ;

(ग) या प्रकरणाखाली ज्या संस्थेच्या प्राधिकाऱ्यांनी तिच्या पाठ्यक्रमाला किंवा परीक्षेला मान्यता मिळावी म्हणून अर्ज केला असेल अशा कोणत्याही संस्थेची पाहणी करता येईल, व अशा संस्थेतील कोणत्याही परीक्षेच्या वेळी उपस्थित राहता येईल.

(३) पोटकलम (२) खाली कोणत्याही परीक्षेच्या वेळी उपस्थित राहणारा निरीक्षक, परीक्षेच्या कामकाजात हस्तक्षेप करणार नाही, पण तो उपस्थित राहील अशी प्रत्येक परीक्षा पुरेशी आहे किंवा कसे त्यासंबंधी व ज्याबाबत कार्यकारी समिती त्याला अहवाल देण्यास सांगेल अशा अन्य कोणत्याही बाबीसंबंधी कार्यकारी समितीस तो अहवाल देईल.

(४) कार्यकारी समिती, अशा प्रत्येक अहवालाची एकेक प्रत संबंधित प्राधिकरण किंवा संस्था यांच्याकडे पाठवील, आणि उक्त प्राधिकरणाने किंवा संस्थेने त्यावर कोणतेही अभिप्राय दिले असल्यास त्यांसह त्याची एकेक प्रत केंद्र शासनाकडे आणि प्राधिकरण किंवा संस्था ज्या राज्यात असेल अशा राज्याच्या शासनाकडेही पाठवील.

माहिती सादर करावयाची. १७. (१) केंद्रीय परिषद, आपल्या कार्यवृत्तांच्या व कार्यकारी समितीच्या कार्यवृत्तांच्या प्रती आणि आपल्या कार्याचा वार्षिक अहवाल [२]* * * * केंद्र शासनाला सादर करील.

(२) केंद्र शासनाला, या कलमाखाली किंवा कलम १६ खाली त्याच्याकडे सादर करण्यात आलेला कोणताही अहवाल [३][ किंवा प्रत ] त्यास योग्य वाटेल अशा रीतीने प्रसिद्ध करता येईल.

[४][ हिशेब व लेखा-परीक्षा. ] [४][ १७क. (१) केंद्र शासन हे भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक याच्याशी विचार विनिमय करून जे सर्वसाधारण निदेश देईल त्यांस अनुसरून आणि ते विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात व अशा रीतीने केंद्रीय परिषद, योग्य ते हिशेब व इतर संबद्ध अभिलेख ठेवील आणि हिशेबांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील.

(२) केंद्रीय परिषदेच्या हिशेबांची लेखापरीक्षा भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक याच्याकडून किंवा तो याबाबतीत प्राधिकृत करील अशा व्यक्तीकडून दरवर्षी केली जाईल आणि त्याला किंवा अशा रीतीने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला अशा लेखापरीक्षेसंबंधात आलेला कोणताही खर्च केंद्रीय परिषदेकडून भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक यास प्रदेय असेल.

---

१. १९७६ चा अधिनियम ७०-कलम ९ द्वारे हा मजकूर घातला (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).
२. कित्ता—कलम १० द्वारे गाळले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).
३. कित्ता—कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).
४. कित्ता—कलम ११ द्वारे घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(३) भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक आणि केंद्रीय परिषदेच्या हिशेबांच्या लेखापरीक्षेच्या संबंधात त्याने प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती यांना अशा लेखापरीक्षेच्या बाबतीत, सरकारी हिशेबांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात नियंत्रक व महालेखापरीक्षक याला जसे असतात तसेच अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार असतील आणि विशेषेकरून, हिशेबपुस्तके, संबंधित प्रमाणके व इतर दस्तऐवज व कागदपत्रे हजर करण्याची मागणी करण्याचा हक्क असेल.

(४) भारताचा नियंत्रक व महा लेखापरीक्षक याने, किंवा त्याच्याकडून या बाबतीत प्राधिकृत झालेल्या व्यक्तीने प्रमाणित केल्यानुसार असलेले हिशेब त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह केंद्रीय परिषदेकडे दर वर्षी पाठवण्यात येतील आणि ही परिषद आपल्या अभिप्रायांसह ते हिशेब केंद्र शासनाकडे पाठवील.]

१८. (१) केंद्रीय परिषदेला, या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्यासाठी केंद्र शासनाच्या मान्यतेने या अधिनियमाशी सुसंगत असे विनियम करता येतील. विनियम करण्याची शक्ती.

(२) विशेषतः व पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, अशा विनियमांद्वारे पुढील गोष्टीं-करिता उपबंध करता येईल—

[१][ (क) केंद्रीय परिषदेच्या संपत्तीची व्यवस्था पाहणे ;]

(ख) या प्रकरणाखालील निवडणुका कशा रीतीने घ्याव्या ;

(ग) केंद्रीय परिषदेच्या सभा बोलावणे व भरवणे, अशा सभा केव्हा व कोठे भरवाव्या त्या वेळा व ती ठिकाणे, त्यांमध्ये चालवावयाचे कामकाज व गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेली सदस्य-संख्या ;

(घ) कार्यकारी समितीची कार्ये, तिच्या सभा बोलावणे व भरवणे, अशा सभा केव्हा व कोठे भरवाव्या त्या वेळा व ती ठिकाणे, आणि गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेली सदस्य-संख्या ;

(ङ) अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या शक्ती व कर्तव्ये ;

(च) केंद्रीय परिषदेचा [१][ निबंधक, सचिव ], निरीक्षक व अन्य अधिकारी आणि सेवक यांच्या अर्हता, पदावधी आणि त्यांच्या शक्ती व कर्तव्ये—[१][ निबंधकाने किंवा इतर कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा सेवकाने ] द्यावयाच्या प्रतिभूतीची रक्कम व स्वरूप यांसुद्धा ;

[२][ (छ) केंद्रीय नोंदवही कशा रीतीने ठेवावी व तिला कशा रीतीने प्रसिद्धी द्यावी ;

(ज) कार्यकारी समितीशिवाय इतर समित्यांची घटना व कार्ये, त्यांच्या सभा बोलावणे व भरवणे, अशा सभा कोणत्या वेळेस व कोणत्या ठिकाणी घेण्यात याव्यात ती वेळ व ते ठिकाण आणि गणपूर्तीसाठी आवश्यक असलेली सदस्य-संख्या. ]

(३) केंद्रीय परिषदेकडून या कलमाखाली विनियम करण्यात येईपर्यंत, सभापतीस, केंद्र शासनाच्या पूर्वमंजुरीने, या प्रकरणांची प्रयोजने पार पाडण्याच्या दृष्टीने आवश्यक असतील असे, विनियम—केंद्रीय परिषदेच्या पहिल्या निवडणुका कशा रीतीने घ्यावयाच्या त्यासंबंधी उपबंध करणाऱ्या विनियमांसुद्धा—करता येतील, आणि या कलमाखालील आपल्या शक्तींचा वापर करून केंद्रीय परिषदेस, अशा रीतीने केलेल्या कोणत्याही विनियमांमध्ये फेरबदल करता येतील किंवा ते विखंडित करता येतील.

## प्रकरण ३ रे

## राज्य औषधव्यवसाय परिषदा

**१९.** कलम २० खाली केलेल्या करारानुसार एखादी संयुक्त राज्य परिषद घटित करण्यात आली असेल तेवढी बाब खेरीजकरून एरव्ही, राज्य शासन पुढील सदस्यांची मिळून बनलेली एक राज्य परिषद घटित करील, ते सदस्य असे :— **राज्य परिषदांची घटना व रचना.**

(क) राज्याच्या नोंदलेल्या औषध व्यवसायींनी आपल्यामधून निवडून दिलेले सहा सदस्य ;

(ख) राज्य शासनाने नामनियुक्त केलेले पाच सदस्य—त्यांच्यापैकी किमान [३][ तीन ] सदस्य म्हणजे औषधनिर्मितिशास्त्र किंवा औषध रसायनशास्त्र यांतील विहित पदवी किंवा पदविका धारण करणाऱ्या व्यक्ती किंवा [३][ नोंदलेले औषधव्यवसायी ] असतील ;

(ग) प्रत्येक वैद्यकीय परिषदेच्या किंवा, प्रकरणपरत्वे, त्या त्या राज्याच्या वैद्यकीय नोंदणी परिषदेच्या सदस्यांनी आपल्यामधून निवडून दिलेला एक सदस्य ;

(घ) राज्याचा मुख्य प्रशासनिक वैद्यकीय अधिकारी, (पदसिद्ध) किंवा एखाद्या सभेला उपस्थित राहाण्यास तो असमर्थ असेल तर, उपस्थित राहण्यास त्याने लेखी प्राधिकृत केलेली व्यक्ती ;

---

१. १९७६ चा अधिनियम ७०-कलम १२ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. किता—कलम १२ द्वारे घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

३. किता—कलम १३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[1][ (घघ) [2][ 'औषधिद्रव्ये व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४० ' (१९४० चा २३)] याखालील राज्याच्या औषध नियंत्रण संघटनेचा प्रभारी अधिकारी (पदसिद्ध), किंवा एखाद्या सभेला उपस्थित राहाण्यास तो असमर्थ असेल तर, उपस्थित राहण्यास त्याने लेखी प्राधिकृत केलेली व्यक्ती;]

(ङ) [2][ 'औषधिद्रव्ये व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४० ' (१९४० चा २३)] याखालील शासकीय विश्लेषक (पदसिद्ध), किंवा जेथे एकाहून अधिक विश्लेषक असतील तेथे, राज्य शासन या बाबतीत नियुक्त करील असा एक विश्लेषक :

परंतु, कलम २०, पोट-कलम (१)-खंड (ख) याखाली करार करण्यात आला असेल, त्या बाबतीत, करारात अशी तरतूद करता येईल की, सहभागी होणाऱ्या अन्य राज्यांच्याही गरजा भागविण्यासाठी राज्य परिषदेच्या सदस्यांमध्ये उक्त अन्य सहभागी राज्यांपैकी प्रत्येकाच्या शासनाने नामनियुक्त केलेल्या अशा जास्तीत जास्त दोन सदस्यांची भर घालून परिषदेत वाढ करण्यात यावी आणि नेहमी त्यांच्यापैकी किमान एक सदस्य म्हणजे औषधनिर्मितिशास्त्र किंवा औषध रसायनशास्त्र यातील विहित पदवी किंवा पदविका धारण करणारी व्यक्ती किंवा [3][ नोंदलेला औषधव्यवसायी ] असला पाहिजे आणि जेथे करारात तशी तरतूद करण्यात आली असेल तेथे, राज्य परिषदेच्या रचनेत त्यानुसार वाढ करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

आंतरराज्यीय करार.

२०. (१) दोन किंवा अधिक राज्य शासनांना,—

(क) सर्व सहभागी राज्यांकरता एक संयुक्त राज्य परिषद घटित करण्यासाठी, किंवा

(ख) एखाद्या राज्याच्या राज्य परिषदेला अन्य सहभागी राज्यांच्या गरजा भागविता याव्यात यासाठी

तरतूद करणारा करार करता येईल आणि करारात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीपर्यन्त तो अंमलात राहील आणि विनिर्दिष्ट अशा आणखी कालावधीपर्यन्त नूतनीकरण होण्यास तो पात्र असेल.

(२) या अधिनियमात विनिर्दिष्ट केल्या आहेत अशा बाबींव्यतिरिक्त आणखी या कलमाखालील कराराद्वारे,—

(क) राज्य परिषद किंवा संयुक्त राज्य परिषद यांच्या संबंधातील खर्च सहभागी राज्यांमध्ये संविभाजित करण्यासाठी तरतूद करता येईल ;

(ख) राज्य शासनाची या अधिनियमाखालील विविध कार्ये सहभागी राज्य शासनांपैकी कोणत्या राज्य शासनाने पार पाडावीत हे निश्चित करता येईल, आणि राज्य शासनाचे या अधिनियमातील जे उल्लेख आहेत त्यांचा त्यानुसार अर्थ लावला जाईल;

(ग) सर्वसाधारणपणे किंवा या अधिनियमाखाली उद्भवणाऱ्या विशेष बाबींच्या संदर्भात सहभागी राज्य शासनांमध्ये विचारविनिमय होण्यासंबंधी तरतूद करता येईल;

(घ) कराराची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक किंवा समयोचित असल्याचे मानण्यात येतील अशा व या अधिनियमाशी विसंगत नसतील अशा आनुषंगिक किंवा साहाय्यभूत तरतुदी करता येतील.

(३) या कलमाखालील करार सहभागी राज्यांच्या शासकीय राजपत्रांत प्रसिद्ध करण्यात येईल.

संयुक्त राज्य परिषदांची रचना.

२१. संयुक्त राज्य परिषद पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल, ते सदस्य असे :—

(क) कराराद्वारे तरतूद करण्यात येईल त्याप्रमाणे कमीत कमी तीन व जास्तीत जास्त पाच या मर्यादेत, सहभागी राज्यांपैकी प्रत्येकाच्या नोंदलेल्या औषधव्यवसायींनी आपल्यामधून निवडून दिलेले सदस्य ;

(ख) कराराद्वारे तरतूद करण्यात येईल त्याप्रमाणे कमीत कमी दोन व जास्तीत जास्त चार या मर्यादेत, प्रत्येक सहभागी राज्याने नामनियुक्त केलेले सदस्य ;

(ग) प्रत्येक वैद्यकीय परिषदेच्या किंवा, प्रकरणपरत्वे, प्रत्येक सहभागी राज्याच्या वैद्यकीय नोंदणी परिषदेच्या सदस्यांनी आपल्यामधून निवडून दिलेला एक सदस्य ;

(घ) प्रत्येक सहभागी राज्याचा मुख्य प्रशासनिक वैद्यकीय अधिकारी (पदसिद्ध), मुख्य किंवा एखाद्या सभेला उपस्थित राहाण्यास तो असमर्थ असेल तर, तसे करण्यास त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती;

[3][ (घघ) [4][ 'औषधिद्रव्ये व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४० ' (१९४० चा २३)] याखाली राज्याच्या औषध नियंत्रण संघटनेचा प्रभारी अधिकारी (पदसिद्ध), किंवा एखाद्या सभेला उपस्थित रहाण्यास तो असमर्थ असेल तर, तसे करण्यास त्याने लेखी प्राधिकृत केलेली व्यक्ती; ]

---

१. १९५९ चा अधिनियम २४-कलम ७ द्वारे घातले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम ८ द्वारे घातले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. १९७६ चा अधिनियम ७०-कलम १३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. १९७६ चा अधिनियम ७०-कलम १४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(ङ) प्रत्येक सहभागी राज्याचा [1][' औषधिद्रव्ये व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४०' (१९४० चा २३)] याखालील शासकीय विश्लेषक, (पदसिद्ध), किंवा अशा कोणत्याही राज्यामध्ये एकाहून अधिक विश्लेषक असतील तर, राज्य शासन या बाबतीत नियुक्त करील असा त्यांच्यापैकी एक विश्लेषक.

(२) करारात अशी तरतूद करता येईल की, पोटकलम (१)-खंड (क) व (ख) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेत, त्या खंडांखाली निवडून द्यावयाच्या किंवा नामनियुक्त करावयाच्या सदस्यांची संख्या प्रत्येक सहभागी राज्याच्या बाबतीत सारखी असेल किंवा असणारही नाही.

(३) पोटकलम (१)-खंड (ख) खाली प्रत्येक राज्य शासनाने नामनियुक्त केलेल्या सदस्यांपैकी, निदान [1][निम्म्याहून अधिक] सदस्य हे, औषधनिर्मितिशास्त्र किंवा औषध रसायनशास्त्र यातील विहित पदवी किंवा पदविका धारण करणाऱ्या व्यक्ती किंवा [1][नोंदलेले औषधव्यवसायी] असतील.

२२. प्रत्येक राज्य परिषद हा, स्थावर व जंगम अशी दोन्ही प्रकारची संपत्ती संपादन करण्याच्या व धारण करण्याच्या शक्तीसह, उत्तराधिकाराची निरंतर परंपरा व सामाईक मोहोर असलेला, राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल किंवा संयुक्त राज्य परिषदेच्या बाबतीत करारात निश्चित करण्यात येईल अशा नावाचा निगमनिकाय असेल आणि त्या नावाने तो दावा लावील व त्याच्याविरुद्ध दावा लावण्यात येईल. राज्य परिषदांचे निगमन.

२३. (१) राज्य परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची, परिषदेचे सदस्य आपल्यामधून निवड करतील : राज्य परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष.

परंतु, राज्य परिषद प्रथमतः घटित करण्यात आल्यापासून पाच वर्षेपर्यंत, अध्यक्ष हा राज्य शासनाकडून नामनिर्देशित झालेली व्यक्ती असेल आणि तो राज्य शासनाची मर्जी असेतोपर्यंत पद धारण करील आणि अगोदरपासून सदस्य नसेल तर, तो कलम १९ किंवा, प्रकरणपरत्वे, कलम २१ यामध्ये उल्लेखिलेल्या सदस्यांच्या जोडीला, राज्य परिषदेचा सदस्य होईल.

(२) [2][अध्यक्ष] किंवा उपाध्यक्ष हा त्या नात्याने जास्तीत जास्त पाच वर्षेपर्यंत ते पद धारण करील,—मात्र हा पदावधी त्याच्या राज्य परिषदेच्या सदस्यत्वाच्या मुदतीपलिकडे लांबणार नाही, पण त्याचे राज्य परिषदेचे सदस्यत्व चालू असले पाहिजे या शर्तीवर तो फेरनिवडणुकीस पात्र असेल :

[3][परंतु, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून ज्या मुदतीसाठी तो निवडून आला असेल ती संपूर्ण मुदत समाप्त होण्यापूर्वी राज्य परिषदेचा सदस्य म्हणून त्याचा पदावधी समाप्त होत असेल तर, तो राज्य परिषदेचा सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यास अगर पुन्हा नामनियुक्त केला गेल्यास, अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या पदावर तो ज्या मुदतीसाठी निवडून आला असेल त्या संपूर्ण मुदतीपर्यंत तो ते पद धारण करण्याचे चालू ठेवील.]

२४. या प्रकरणाखालील निवडणुका विहित रीतीने घेण्यात येतील, आणि अशा कोणत्याही निवडणुकीसंबंधात कोणताही तंटा उद्भवला तर, तो राज्य शासनाकडे निर्णयार्थ सोपवण्यात येईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल. निवडणुकांची पद्धती.

२५. (१) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, नामनियुक्त अध्यक्षाव्यतिरिक्त, नामनियुक्त केलेला किंवा निवडून आलेला सदस्य त्याच्या नामनियुक्तीच्या किंवा तो निवडून आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांची मुदत किंवा त्याच्या उत्तराधिकाऱ्यास रीतसर नामनियुक्त करण्यात येईपर्यंतची किंवा निवडून देण्यात येईपर्यंतची मुदत यांपैकी जी अधिक असेल त्या मुदतीपर्यंत पद धारण करील. पदावधी व निमित्तवशात् रिकाम्या होणाऱ्या जागा.

(२) नामनियुक्त केलेला किंवा निवडून आलेला सदस्य कोणत्याही वेळी, अध्यक्षास उद्देशून लिहिलेल्या स्वाक्षरित लेखाद्वारे आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊ शकेल, आणि तदनंतर अशा सदस्याची जागा रिकामी होईल.

(३) नामनियुक्त केलेला किंवा निवडून आलेला सदस्य, राज्य परिषदेच्या लागोपाठच्या तीन बैठकींना राज्य परिषदेच्या मते पुरेशी असेल अशा सबबीशिवाय अनुपस्थित राहिला तर, किंवा जर तो कलम १९ किंवा २१ याचा खंड (क) किंवा (ग) याखाली निवडून आलेला असून तो वैद्यकीय परिषदेचा किंवा, प्रकरणपरत्वे, त्या राज्याच्या वैद्यकीय नोंदणी परिषदेचा सदस्य असण्याचे बंद झाले तर, त्याची जागा रिकामी झाली असल्याचे मानण्यात येईल.

---

१. १९७६ चा अधिनियम ७०- कलम १४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम १५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम १५ द्वारे जादा दाखल केले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(४) राज्य परिषदेतील निमित्तवशात् रिकामी झालेली जागा ही, नव्याने नामनियुक्ती करून किंवा, प्रकरणपरत्वे, निवडणूक घेऊन त्याद्वारे भरण्यात येईल, आणि रिकामी जागा भरण्यासाठी नामनियुक्त करण्यात आलेली किंवा निवडून देण्यात आलेली व्यक्ती ज्या सदस्याची जागा घेईल त्याची नामनियुक्ती किंवा निवड जितक्या मुदतीकरता झाली होती तिच्यापैकी उर्वरित मुदतीपर्यंतच फक्त ती व्यक्ती पद धारण करील.

(५) राज्य परिषदेने केलेल्या कोणत्याही कृतीला, राज्य परिषदेमध्ये एखादी जागा रिकामी होती किंवा तिच्या घटनेत कोणतीही उणीव होती एवढ्याच केवळ कारणावरून आक्षेप घेता येणार नाही.

(६) राज्य परिषदेचे सदस्य पुनर्नामनियुक्तीस किंवा फेरनिवडणुकीस पात्र असतील.

कर्मचारीवर्ग, पारिश्रमिक व भत्ते.

२६. राज्य परिषदेला, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने,—

(क) एखाद्या निबंधकाची नियुक्ती करता येईल व तो राज्य परिषदेचा सचिव म्हणून आणि, राज्य परिषदेने तसे ठरवल्यास तिचा कोषाध्यक्ष म्हणूनही काम पाहील ;

(ख) राज्य परिषदेला या अधिनियमाखालील आपली कामे पार पाडणे शक्य व्हावे म्हणून आवश्यक असतील असे अन्य अधिकारी व सेवक यांची नियुक्ती करता येईल ;

(ग) राज्य परिषदेचा सचिव आणि अन्य अधिकारी व सेवक यांची वेतनें व भत्ते, आणि अन्य सेवा-शर्ती ठरवता येतील ;

(घ) राज्य परिषदेच्या सदस्यांना प्रदेय असलेल्या भत्त्यांचे दर ठरवता येतील :

परंतु, राज्य परिषद प्रथमत: घटित करण्यात आल्यापासून चार वर्षेपर्यंत, निबंधक म्हणजे राज्य शासनाने नियुक्त केलेली व्यक्ती असेल आणि तो राज्य शासनाची मर्जी असेतोपर्यंत पद धारण करील.

[1][पाहणी.

[1][२६क. (१) राज्य परिषदेस, राज्य शासनाची पूर्वमंजुरी घेऊन, या अधिनियमाच्या ३ऱ्या, ४ थ्या व ५ व्या प्रकरणांच्या प्रयोजनांसाठी विहित अर्हता असणाऱ्या निरीक्षकांची नियुक्ती करता येईल.

(२) निरीक्षकास,—

(क) जेथे औषधिद्रव्यांचे मिश्रण केले जाते किंवा ती तयार करून दिली जातात अशा कोणत्याही वास्तूंची पाहणी करता येईल व निबंधकाकडे लेखी अहवाल सादर करता येईल ;

(ख) औषधिद्रव्यांचे मिश्रण करणारी किंवा ती तयार करून देणारी व्यक्ती ही नोंदलेली औषधव्यवसायी आहे किंवा कसे याची चौकशी करता येईल ;

(ग) या अधिनियमाचे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण झाले असल्याबद्दल करण्यात आलेल्या कोणत्याही लेखी तक्रारीसंबंधी बारकाईने तपास करता येईल ;

(घ) राज्य परिषदेच्या कार्यकारी समितीच्या आदेशान्वये खटला दाखल करता येईल ;

(ङ) या अधिनियमाच्या ३ ऱ्या, ४ थ्या आणि ५ व्या प्रकरणांची किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर शक्तींचा वापर करता येईल.

(३) या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये, अथवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांद्वारे किंवा त्यांअन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करताना एखाद्या निरीक्षकास हेतुपुरस्सर अटकाव करणारी कोणतीही व्यक्ती, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासास, किंवा जास्तीत जास्त एक हजार रुपये एवढ्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(४) प्रत्येक निरीक्षक हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)-कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.]

कार्यकारी समिती.

२७. (१) राज्य परिषद, होईल तितक्या लवकर, एक कार्यकारी समिती घटित करील व अध्यक्ष (हा कार्यकारी समितीचा सभापती असेल) आणि उपाध्यक्ष, (पदसिद्ध) आणि राज्य परिषदेने आपल्या सदस्यांमधून निवडून दिलेले असे विहित करण्यात येतील तितके अन्य सदस्य मिळून ती बनलेली असेल.

(२) कार्यकारी समितीचा सदस्य, हा त्या नात्याने, राज्य परिषदेचा सदस्य म्हणून त्याचा पदावधी संपेपर्यंत पद धारण करील, पण त्याचे राज्य परिषदेचे सदस्यत्व चालू राहिल्यास तो फेरनिवडणुकीस पात्र असेल.

(३) या अधिनियमाद्वारे कार्यकारी समितीला प्रदान करण्यात आलेल्या शक्ती व तिच्याकडे सोपवण्यात आलेली कर्तव्ये याव्यतिरिक्त, ती समिती विहित करण्यात येतील अशा शक्ती वापरील व अशी विहित कर्तव्ये पार पाडील.

---

१. १९७६ चा अधिनियम ७०-कलम १६ द्वारे घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२८. (१) राज्य परिषद ही, राज्य शासन वेळोवेळी मागवील असे अहवाल, आपल्या कार्यवृत्तांच्या व कार्यकारी समितीच्या कार्यवृत्तांच्या प्रती, आणि आपल्या हिशेबांचे गोषवारे राज्य शासनाला सादर करील आणि त्यांच्या प्रती केंद्रीय परिषदेकडे पाठविण्यात येतील. माहिती सादर करावयाची.

(२) राज्य शासनाला, या कलमाखाली त्याच्याकडे सादर केलेला कोणताही अहवाल, प्रत, गोषवारा किंवा अन्य माहिती त्यास योग्य वाटेल अशा रीतीने प्रसिद्ध करता येईल.

## प्रकरण ४ थे

### औषधव्यवसायींची नोंदणी

२९. (१) हे प्रकरण कोणत्याही राज्यात परिणामक झाल्यानंतर शक्य होईल तेवढ्या लवकर राज्य शासन त्या राज्याकरता एक औषधव्यवसायींची नोंदवही यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने तयार करण्याची व्यवस्था करील. नोंदवही तयार करणे व ठेवणे.

(२) राज्य परिषद, ती घटित झाल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, या अधिनियमाच्या उपबंधांनुसार नोंदवही ठेवण्याचे काम अंगीकारील.

(३) नोंदवहीत पुढील तपशील अंतर्भूत असेल, तो असा :—

(क) नोंदलेल्या व्यक्तीचे पूर्ण नाव व निवासस्थानाचा पत्ता;

(ख) नोंदवहीत त्या व्यक्तीची प्रथमतः नोंद केल्याचा दिनांक;

(ग) नोंदणीकरता तिच्या अर्हता;

(घ) तिच्या व्यवसायाच्या ठिकाणाचा पत्ता, आणि जर ती कोणत्याही व्यक्तीच्या नोकरीत असेल तर, अशा व्यक्तीचे नाव;

(ङ) विहित करण्यात येईल असा आणखी तपशील.

३०. (१) पहिली नोंदवही तयार करण्याच्या प्रयोजनार्थ, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, तीन व्यक्ती मिळून बनलेले एक नोंदणी अधिकरण घटित करील आणि निबंधकाचीही नियुक्ती करील व असा निबंधक नोंदणी अधिकरणाचा सचिव म्हणून काम पाहील. पहिली नोंदवही तयार करणे.

(२) राज्य शासन, त्याच किंवा तशाच प्रकारच्या अधिसूचनेद्वारे, कोणत्या दिनांकास किंवा कोणत्या दिनांकापूर्वी नोंदणी अधिकरणाकडे नोंदणीसाठी अर्ज करावा लागेल व त्यासोबत विहित फी द्यावी लागेल ते नियत करील.

(३) नोंदणी अधिकरण, नियत दिनांकास किंवा तत्पूर्वी त्याच्याकडे आलेल्या प्रत्येक अर्जाची तपासणी करील, आणि कलम ३१ खाली नोंदला जाण्यास अर्जदार अर्ह आहे अशी त्याची खात्री झाली तर, ते नोंदवहीत अर्जदाराच्या नावाची नोंद करण्याचा निदेश देईल.

(४) अशा प्रकारे तयार केलेली पहिली नोंदवही, राज्य शासन निदेश देईल अशा रीतीने त्यानंतर प्रकाशित करण्यात येईल, आणि अशा रीतीने प्रकाशित झालेल्या नोंदवहीत नोंदणी अधिकरणाचा जो निर्णय व्यक्त किंवा उपलक्षित झाला असेल त्यामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा प्रकाशनाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आंत, राज्य शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या बाबतीत नियुक्त केलेल्या प्राधिकरणाकडे अपील करता येईल.

(५) निबंधक पोटकलम (४) खाली नियुक्त केलेल्या प्राधिकरणाच्या निर्णयानुसार नोंदवही विशोधित करील आणि तदनंतर, जिचे नाव नोंदवहीत दाखल करण्यात आले आहे अशा प्रत्येक व्यक्तीस विहित नमुन्यात नोंदणी प्रमाणपत्र देईल.

(६) राज्य परिषद घटित करण्यात आल्यावर, नोंदवही तिच्या हवाली करण्यात येईल, आणि पहिल्या नोंदवहीत नोंदणी होण्यासाठी करण्यात आलेल्या अर्जाची संपूर्ण फी किंवा तिचा कोणताही विनिर्दिष्ट अंश राज्य परिषदेच्या नावे जमा करण्यात यावा असे राज्य शासन निदेशित करू शकेल.

३१. [२][जिच्या वयाला अठरा वर्षे पूर्ण झाली आहेत अशी व्यक्ती, जर ती राज्यात राहात असेल अथवा औषधविषयक धंदा किंवा पेशा चालवत असेल आणि जर ती व्यक्ती — पहिल्या नोंदवहीत नोंद होण्यासाठी अर्हता.

(क) एखाद्या भारतीय विद्यापीठाची औषधनिर्मितिशास्त्र किंवा औषध रसायनशास्त्र यामधील पदवी किंवा पदविका अगर, प्रकरणपरत्वे, एखाद्या राज्य शासनाची औषधविक्रेत्याच्या किंवा गंध्याच्या व्यवसायातील पदविका अथवा भारताच्या [१]* * * * बाहेरील प्राधिकरणाने प्रदान केलेली विहित अर्हता धारण करत असेल तर, किंवा

(ख) औषधनिर्मितिशास्त्र किंवा औषधरसायनशास्त्र यातील पदवीहून अन्य एखादी भारतीय विद्यापीठाची पदवी धारण करीत असेल, आणि जेथे वैद्यक व्यवसायींनी दिलेल्या औषधपत्रांनुसार नेहमी औषधे तयार करून देण्यात येतात अशा रुग्णालयात किंवा दवाखान्यात

---

१. 'अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे 'प्रांत' हा शब्दोल्लेख गाळला.

२. १९५९ चा अधिनियम २४-कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

किंवा अन्य ठिकाणी ती औषधांचे मिश्रण करण्याचे काम एकूण किमान तीन वर्षे इतका काळ करीत असेल तर, किंवा

(ग) मिश्रक किंवा औषधकार यांच्याकरता पुरेशी म्हणून राज्य शासनाने मान्यता दिलेली परीक्षा उत्तीर्ण झाली असेल तर, किंवा

(घ) जेथे वैद्यक व्यवसायींनी दिलेल्या औषधपत्रांनुसार नेहमी औषधे तयार करून देण्यात येतात अशा रुग्णालयात किंवा दवाखान्यात किंवा अन्य ठिकाणी औषधांचे मिश्रण करण्याचे काम, कलम ३० च्या पोटकलम (२) खाली अधिसूचित केलेल्या दिनांकापूर्वी एकूण किमान पाच वर्षे इतका काळ करीत असेल तर,

विहित फी भरण्यात आल्यावर तिचे नाव पहिल्या नोंदवहीत नोंदले जाण्याचा हक्क तिला प्राप्त होईल.

नंतरच्या नोंदणी-साठी अर्हता.

३२. (१) कलम ३० च्या पोटकलम (२) खाली नियत केलेल्या दिनांकानंतर आणि कलम ११ द्वारे किंवा त्याखाली शिक्षणविषयक विनियम राज्यात परिणामक होण्यापूर्वी, [1][जिच्या वयाला अठरा वर्षे पूर्ण झाली आहेत अशी व्यक्ती] जर ती राज्यात राहात असेल अथवा औषधविषयक धंदा किंवा पेशा चालवत असेल आणि जर ती व्यक्ती,—

(क) केंद्रीय परिषदेच्या पूर्वमान्यतेने विहित केलेल्या शर्ती किंवा जेव्हा कोणत्याही शर्ती विहित करण्यात आल्या नसतील तेव्हा, कलम ३१ मध्ये दिल्याप्रमाणे नोंदवहीत नाव नोंदले जाण्याचा हक्क एखाद्या व्यक्तीस प्राप्त करून देणाऱ्या शर्ती पूर्ण करीत असेल तर, किंवा

(ख) अन्य राज्यातील नोंदलेला औषधव्यवसायी असेल, किंवा

(ग) कलम १४ खाली मान्य केलेली अर्हता धारण करीत असेल तर,

विहित फी भरण्यात आल्यावर तिचे नाव नोंदवहीत नोंदले जाण्याचा हक्क तिला प्राप्त होईल :

परंतु, एखादी व्यक्ती जर मॅट्रिक्युलेशन परीक्षा किंवा मॅट्रिक्युलेशन परीक्षेशी तुल्य म्हणून विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल तर, तिचे नाव नोंदवहीत नोंदले जाण्याचा हक्क [1][खंड (क) किंवा खंड (ग) खाली] तिला प्राप्त होणार नाही.

(२) कलम ११ द्वारे किंवा त्याखाली शिक्षणविषयक विनियम, राज्यात परिणामक झाल्यानंतर, जर एखाद्या व्यक्तीच्या वयाला [2][अठरा वर्षे] पूर्ण झाली असतील आणि जर ती त्या राज्यात राहात असेल किंवा औषधविषयक धंदा किंवा पेशा चालवत असेल आणि मान्य परीक्षा उत्तीर्ण झाली असेल किंवा कलम १४ खाली मान्य अशी अर्हता धारण करीत असेल [2][किंवा अन्य राज्यातील नोंदलेला औषधव्यवसायी असेल] तर, विहित फी भरण्यात आल्यावर तिचे नाव नोंदवहीत नोंदले जाण्याचा हक्क तिला प्राप्त होईल.

[3][विवक्षित व्यक्तीं-च्या नोंदणीसाठी विशेष उपबंध.]

[3][३२क. (१) कलम ३२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य परिषद पुढील व्यक्तींचीही नावे नोंदवहीत नोंदण्यास परवानगी देऊ शकेल :—

(क) ज्या विस्थापित व्यक्ती आपल्या उपजीविकेचे प्रमुख साधन म्हणून ४ मार्च, १९४१ पूर्वीच्या दिनांकापासून औषधविषयक धंदा किंवा पेशा चालवत आलेल्या असतील, आणि कलम ३८ मध्ये दिल्याप्रमाणे नोंदणीच्या शर्ती पूर्ण करीत असतील अशा व्यक्तींची नावे ;

(ख) जे भारताचे नागरिक भारताबाहेरील कोणत्याही देशात औषधविषयक धंदा किंवा पेशा चालवत आले असतील आणि कलम ३१ मध्ये दिल्याप्रमाणे नोंदणीच्या शर्ती पूर्ण करत असतील त्यांची नावे ;

(ग) मागाहून जे भारताचे राज्यक्षेत्र झाले अशा क्षेत्रात ज्या वास्तव्य करीत होत्या आणि कलम ३१ मध्ये दिल्याप्रमाणे नोंदणीच्या शर्ती पूर्ण करतात अशा व्यक्तींची नावे ;

(घ) ज्या व्यक्ती राज्यामध्ये औषधविषयक धंदा किंवा पेशा चालवत असतील, आणि,—

(एक) ज्यांनी कलम ३०-पोटकलम (२) मध्ये नियत केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी नोंदणीकरता अर्ज केला असता तर कलम ३१ मध्ये दिल्याप्रमाणे नोंदणीच्या शर्ती त्या दिनांकास ज्यांनी पूर्ण केल्या असत्या ; किंवा

(दोन) कलम २-खंड (च)-उपखंड (तीन) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या वैद्यक व्यवसायींनी दिलेल्या औषधपत्रांनुसार जेथे नेहमी औषधे तयार करून देण्यात येतात अशा रुग्णालयात किंवा दवाखान्यात किंवा अशा अन्य ठिकाणी ज्यांनी औषधिद्रव्यांचे मिश्रण करण्याचे काम कलम ३०-पोटकलम (२) खाली नियत केलेल्या दिनांकापूर्वी एकूण किमान पाच वर्षे इतका काळ केलेले असेल,

अशा व्यक्तींची नावे;

---

१. १९५९ चा अधिनियम २४-कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम १० द्वारे घातले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम ११ द्वारे घातले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

(ङ) एखादे राज्य १ नोव्हेंबर, १९५६ या दिवसाच्या लगतपूर्वी जसे अस्तित्वात होते तशा त्या राज्याच्या नोंदवहीत नोंद होण्यास ज्या व्यक्ती अर्ह आहेत. परंतु जेथे त्यांनी वास्तव्य केले होते अथवा औषधविषयक धंदा किंवा पेशा चालवला होता ते क्षेत्र त्या दिनांकास झालेल्या रचनेनुसार एखाद्या राज्याचा भाग झाल्याकारणाने आणि केवळ त्या मॅट्रिक्युलेशन परीक्षा किंवा मॅट्रिक्युलेशन परीक्षेशी तुल्य म्हणून विहित केलेली परीक्षा किंवा एखादी मान्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या नाहीत अथवा कलम १४ खाली मान्यता दिलेली अर्हता त्यांच्यापाशी नाही एवढ्याच कारणावरून ज्या व्यक्ती अशा दुसऱ्या राज्याच्या नोंदवहीत नोंद होण्यास अर्ह नाहीत अशा व्यक्तींची नावे ;

(च्) (एक) एखादे राज्य १ नोव्हेंबर १९५६ या दिवसाच्या लगतपूर्वी जसे अस्तित्वात होते तशा त्या राज्याच्या नोंदवहीत समाविष्ट केलेल्या ; आणि

(दोन) ज्या व्यक्ती त्यांनी जेथे वास्तव्य केले होते अथवा औषधविषयक धंदा किंवा पेशा चालवला होता ते क्षेत्र, त्या दिनांकास झालेल्या रचनेनुसार एखाद्या राज्याचा भाग झाल्याकारणाने त्या दुसऱ्या राज्यात त्यांचे वास्तव्य आहे अथवा तेथे त्या असा धंदा किंवा पेशा चालवतात असे ठरते,

अशा व्यक्तींची नावे ;

(छ) 'औषधव्यवसाय (विशोधन) अधिनियम, १९५९' (१९५९ चा २४) याच्या प्रारंभानंतर हे प्रकरण ज्या क्षेत्रात परिणामक होत असेल अशा क्षेत्रात ज्या वास्तव्य करीत असतील आणि कलम ३१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या व्यक्ती त्या शर्ती पूर्ण करत असतील अशा व्यक्तींची नावे.

(२) आपले नाव पोटकलम (१) ला अनुसरून नोंदवहीत नमूद करवून घेण्याची जिची इच्छा असेल अशा कोणाही व्यक्तीला त्या संबंधात राज्य परिषदेकडे अर्ज करावा लागेल, आणि अशा अर्जासोबत विहित फी भरावी लागेल.

(३) या कलमाचे उपबंध 'औषधव्यवसाय (विशोधन) अधिनियम, १९५९' (१९५९ चा २४) याच्या प्रारंभापासून दोन वर्षांच्या कालावधीपर्यंत प्रवर्तनात राहतील ;

परंतु, राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पोटकलम (१) चा खंड (क), खंड (ख) किंवा खंड (ग) याच्या प्रवर्तनाचा कालावधी अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा आणखी कालावधीने किंवा कालावधींनी वाढवता येईल, मात्र तो सगळा मिळून दोन वर्षांपेक्षा अधिक असू नये.

स्पष्टीकरण १.—पोटकलम (१)-खंड (क) च्या प्रयोजनार्थ, "विस्थापित व्यक्ती" याचा अर्थ, इंडिया व पाकिस्तान या अधिराज्ये निर्माण झाल्यामुळे किंवा मुलकी दंग्याधोप्यांमुळे अथवा आता पाकिस्तानचा एक भाग झालेल्या कोणत्याही क्षेत्रातील दंगलींच्या भीतीमुळे १ मार्च १९४७ रोजी किंवा त्यानंतर जिने अशा क्षेत्रातील आपले वास्तव्याचे ठिकाण सोडले असेल किंवा जिला तेथून विस्थापित करण्यात आले असेल आणि तेव्हापासून जी भारतात राहात असेल अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे.

स्पष्टीकरण २.—पोटकलम (१) चे खंड (क), (ग) आणि (छ) यांच्या प्रयोजनार्थ, कलम ३१-खंड (घ) मध्ये उल्लेखिलेल्या कालावधीची संगणना अर्जाचा दिनांक लक्षात घेऊन करण्यात येईल.]

[1][३२ख. कलम ३२ किंवा कलम ३२क मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य परिषद पुढील व्यक्तींची नावे नोंदवहीत दाखल करण्यास परवानगी देऊ शकेल :— [1][विस्थापित व्यक्ती, स्वदेशी परतलेल्या व्यक्ती आणि इतर व्यक्ती यांच्या नोंदणीबद्दलचे विशेष उपबंध.]

(क) कलम ३१ चा खंड (क) किंवा खंड (ग) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अर्हता ज्यांनी प्राप्त केलेल्या आहेत आणि पहिली नोंदवही ज्या दिवशी संपत असेल तो दिवस व शिक्षणविषयक विनियम ज्या तारखेस अंमलात आले असतील ती तारीख या दरम्यानच्या कालावधीत ज्या व्यक्ती नोंदणीस पात्र असतील अशा व्यक्तींची नावे ;

(ख) 'औषधिद्रव्य व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४०' (१९४० चा २३) याअन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये औषधिद्रव्यांची मिश्रणे तयार करणे किंवा औषधिद्रव्ये तयार करून देणे यासाठी ३१ डिसेंबर, १९६९ पूर्वी "अर्हताप्राप्त व्यक्ती" म्हणून मान्यता देण्यात आलेल्या व्यक्तींची नावे ;

(ग) नोंदणीसाठी केलेल्या अर्जाच्या तारखेच्या लगतपूर्वी एकूण किमान पाच वर्षे एवढ्या कालावधीपर्यंत ज्या व्यक्ती भारताबाहेर उपजीविकेचे प्रमुख साधन म्हणून औषध-निर्मितीचा धंदा करीत होत्या किंवा पेशा चालवीत होत्या अशा विस्थापित किंवा स्वदेशी परतलेल्या व्यक्तींची नावे.

स्पष्टीकरण.—या पोटकलमातील,—

(एक) "विस्थापित व्यक्ती" याचा अर्थ, आता बांगला देशाचा भाग बनलेल्या कोणत्याही क्षेत्रातील मुलकी दंग्याधोप्यांमुळे किंवा दंग्याधोप्यांच्या भीतीमुळे १४ एप्रिल, १९५७ नंतर परंतु २५ मार्च, १९७१ पूर्वी जिने अशा क्षेत्रातील आपले वास्तव्याचे ठिकाण सोडले असेल किंवा जिला तेथून विस्थापित करण्यात आले असेल आणि तेव्हापासून जी भारतात राहात असेल ती व्यक्ती असा आहे ;

(दोन) "स्वदेशी परतलेली व्यक्ती" याचा अर्थ, आता ब्रम्हदेश, श्रीलंका किंवा युगांडा यांचा किंवा इतर कोणत्याही देशाचा भाग बनलेल्या कोणत्याही क्षेत्रातील मुलकी दंग्याधोप्यांमुळे

---

१. १९७६ चा अधिनियम ७०-कलम १७ द्वारे घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

किंवा दंग्याधोप्यांच्या भीतीमुळे १४ एप्रिल, १९५७ नंतर जिने अशा क्षेत्रातील आपले वास्तव्याचे ठिकाण सोडले असेल किंवा जिला तेथून विस्थापित करण्यात आले असेल आणि तेव्हापासून जी भारतात राहात असेल अशी मूळची भारतीय व्यक्ती, असा आहे.

(दोन) पोटकलम (१) च्या खंड (क) व (ख) चे उपबंध हे 'औषधव्यवसाय (विशोधन) अधिनियम, १९७६' याच्या प्रारंभाच्या तारखेपासून दोन वर्षांच्या कालावधीपर्यंत अंमलात राहतील.]

नोंदणीकरता आलेल्या अर्जाची छाननी.

३३. (१) कलम ३०-पोटकलम (२) खाली नियत केलेल्या दिनांकानंतर नोंदणीसाठी करावयाचे अर्ज राज्य परिषदेच्या निबंधकास उद्देशून करावे लागतील आणि त्यासोबत विहित फी भरावी लागेल.

(२) असा अर्ज आल्यावर जर निबंधकाचे असे मत झाले की, त्या त्या काळी लागू असलेल्या या अधिनियमाच्या उपबंधांखाली नोंदवहीत नाव नमूद केले जाण्यास अर्जदार हक्कदार आहे, तर तो अर्जदाराचे नाव नोंदवहीत नोंदवील :

परंतु, या अधिनियमाच्या उपबंधांखाली कोणत्याही नोंदवहीतून जिचे नाव काढून टाकण्यात आले आहे अशा कोणत्याही व्यक्तीला, राज्य परिषदेने तिच्या सभेमध्ये आपली मान्यता नोंदवल्याखेरीज, त्या व्यक्तीचे नाव नोंदवहीत नमूद केले जाण्याचा हक्क मिळणार नाही.

(३) ज्या व्यक्तीचा नोंदणीसाठी केलेला अर्ज निबंधकाने फेटाळून लावला आहे अशा कोणत्याही व्यक्तीला, याप्रमाणे अर्ज फेटाळून लावल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत राज्य परिषदेकडे अपील करता येईल आणि राज्य परिषदेचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(४) या कलमाखाली एखाद्या नावाची नोंदवहीत नोंद घेतल्यावर निबंधक विहित नमुन्यात नोंदणी प्रमाणपत्र देईल.[१]

नूतनीकरण फी.

३४. (१) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, नोंदवहीत प्रथमतः ज्या वर्षी नाव नोंदवण्यात आले त्या वर्षानंतर येणाऱ्या वर्षाच्या ३१ डिसेंबरनंतर नोंदवहीत नाव चालू ठेवण्यासाठी विहित करण्यात येईल इतकी नूतनीकरण फी राज्य परिषदेकडे दरवर्षी भरावी लागेल, आणि असा निदेश देण्यात आला असेल तर द्यावयाची अशी नूतनीकरण फी, ज्या वर्षाशी ती संबंधित असेल अशा वर्षाच्या १ एप्रिल पूर्वी देय होईल.

(२) नियत दिनांकापर्यंत नूतनीकरण फी देण्यात आली नाही तर, निबंधक कसूरदाराचे नाव नोंदवहीतून काढून टाकील :

परंतु, अशा प्रकारे काढून टाकलेले नाव, विहित करण्यात येतील अशा शर्तींवर नोंदवहीत पुन्हा दाखल करता येईल.

(३) नूतनीकरण फी भरण्यात आल्यावर निबंधक,[२][ त्याबद्दल एक पावती देईल आणि अशी पावती हा, नोंदणीचे नूतनीकरण केल्याचा पुरावा असेल ].

अतिरिक्त अर्हतांची नोंद करणे.

३५. विहित फी दिल्यावर नोंदलेल्या औषधव्यवसायीला, औषधनिर्मितिशास्त्र किंवा औषध रसायनशास्त्र यांमध्ये तो संपादन करील अशा आणखी कोणत्याही पदव्या किंवा पदविका यांची नोंदवहीत नोंद करवून घेण्याचा हक्क प्राप्त होईल.

नोंदवहीतून नाव काढून टाकणे.

३६. (१) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, नोंदलेल्या औषधव्यवसायीला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि आपणांस योग्य वाटेल अशी आणखी काही चौकशी केल्यानंतर जर कार्यकारी समितीची अशी खात्री झाली की,—

(एक) त्याचे नाव चुकीने किंवा अपवेदनामुळे किंवा महत्त्वपूर्ण वस्तुस्थिती दडवून ठेवल्यामुळे नोंदवहीत नोंदले गेले आहे ; किंवा

(दोन) तो एखाद्या अपराधाबद्दल दोषी ठरला होता किंवा कार्यकारी समितीच्या मते, एखाद्या व्यावसायिक बाबतीत त्याने नोंदवहीत त्याचे नाव चालू ठेवण्यास ज्यामुळे तो अयोग्य ठरतो असे गर्हणीय वर्तन केल्याबद्दल दोषी झालेला होता ; किंवा

(तीन) त्याने आपल्या औषधविषयक धंद्याच्या प्रयोजनांसाठी कामावर ठेवलेली [३][ किंवा कोणत्याही औषधविषयक धंद्यासंबंधात त्याच्या हाताखाली काम करण्यासाठी ठेवलेली ] व्यक्ती

---

१. हा अधिनियम आंध्र प्रदेशाला लागू करताना 'विधि अनुकूलन आदेश (दुसरे विशोधन), १९५४' याद्वारे त्यात कलम ३३क घातले.

हा अधिनियम मद्रास राज्याला लागू करताना, 'विधि अनुकूलन आदेश, १९५४' द्वारे त्यात कलम ३३ क समाविष्ट केले व नंतर 'मद्रास (भर घातलेली क्षेत्रे) विधि अनुकूलन आदेश, १९६१' द्वारे त्याऐवजी नवीन कलम दाखल केले.

२. १९५९ चा अधिनियम २४-कलम १२ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले. (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. किंवा—कलम १३ द्वारे घातले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

अशा कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरलेली होती किंवा अशी व्यक्ती ही जर नोंदलेला औषध-व्यवसायी असती तर खंड (दोन) खाली तिचे नाव नोंदवहीतून काढून टाकले जाण्यास ज्यामुळे ती पात्र ठरली असती अशा कोणत्याही गर्हणीय वर्तनाबद्दल ती दोषी आहे,

तर अशा औषधव्यवसायीचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्यात यावे असा आदेश ती देऊ शकेल :

परंतु,—

(क) नोंदलेल्या औषधव्यवसायीने अपराध किंवा गर्हणीय वर्तन करण्यास चिथावणी दिली होती किंवा त्याने त्याकडे डोळेझाक केली होती, अथवा

(ख) अपराध किंवा गर्हणीय वर्तन ज्या दिनांकास घडले त्या दिनांकाच्या लगतपूर्व बारा महिन्यांच्या कालावधीमध्ये कोणत्याही वेळी नोंदलेल्या औषधव्यवसायीने तसाच अपराध केलेला आहे किंवा तशाच गर्हणीय वर्तनाबद्दल तो दोषी झालेला आहे ; अथवा

(ग) अपराध किंवा गर्हणीय वर्तन ज्या दिनांकास घडले त्या दिनांकाच्या लगतपूर्व बारा महिन्यांच्या कालावधीमध्ये कोणत्याही वेळी नोंदलेल्या औषधव्यवसायीने आपल्या औषधविषयक धंद्याच्या प्रयोजनासाठी कामावर ठेवलेल्या [१][किंवा कोणत्याही औषधविषयक धंद्यासंबंधात त्याच्या हाताखाली काम करण्यासाठी ठेवलेल्या] व्यक्तीने तसाच अपराध केला आहे किंवा तशाच गर्हणीय वर्तनाबद्दल ती दोषी आहे, आणि नोंदलेल्या औषध-व्यवसायीस अशा पूर्वीच्या अपराधाची किंवा गर्हणीय वर्तनाची माहिती होती किंवा वास्तविक असायला हवी होती, अथवा

(घ) अपराध किंवा गर्हणीय वर्तन काही काळ सतत चालू राहिले असेल त्याबाबतीत, नोंदलेल्या औषधव्यवसायीस चालू राहिलेल्या अपराधाची किंवा गर्हणीय वर्तनाची माहिती होती किंवा वास्तविक असायला हवी होती, अथवा

(ङ) अपराध हा [२]["औषधिद्रव्ये व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४०" (१९४०चा २३)] याखालील अपराध असेल त्याबाबतीत, नोंदलेल्या औषधव्यवसायीने आपल्या धंद्याच्या जागी व त्याने कामाला ठेवलेल्या व्यक्तींकरवी [१][किंवा आपल्या नियंत्रणाखालील व्यक्तींकरवी] या अधिनियमाच्या उपबंधांचे पालन करवून घेण्याच्या कामी यथायोग्य तत्परता दाखवलेली नाही,

अशी कार्यकारी समितीची खात्री झाल्याखेरीज खंड (तीन) खाली असा कोणताही आदेश दिला जाणार नाही.

(२) नोंदवहीतून जिचे नाव काढून टाकण्यासाठी आदेश देण्यात आला आहे ती व्यक्ती, या अधिनियमाखाली त्या राज्यात नोंदणी केली जाण्यास कायमची किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीपुरती अपात्र होईल असे पोटकलम (१) खालील आदेशाद्वारे निदेशित करता येईल.

(३) पोटकलम (१) खालील आदेश राज्य परिषदेकडून कायम व्हावा लागेल आणि अशा प्रकारे तो कायम केला गेल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांची मुदत संपेपर्यन्त तो परिणामक होणार नाही.

(४) पोटकलम (१) खालील जो आदेश राज्य परिषदेने कायम केलेला असेल त्यामुळे नाराज झालेल्या व्यक्तीला, आदेश कायम केल्याचे तिला कळवल्यापासून तीस दिवसांच्या आत राज्य शासनाकडे अपील करता येईल, आणि अशा अपिलावरील राज्य शासनाचा आदेश अंतिम असेल.

(५) या कलमाखाली किंवा कलम ३४-पोटकलम (२) खाली जिचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्यात आले असेल अशा व्यक्तीला आपले नोंदणी प्रमाणपत्र तावडतोब निबंधकाच्या स्वाधीन करावे लागेल आणि अशा प्रकारे काढून टाकलेले नाव **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल.

**नोंदवहीत नाव पुन्हा दाखल करणे.**

३७. राज्य परिषद, तिला पुरेशी वाटतील अशा कारणांवरून कोणत्याही वेळी असा आदेश देऊ शकेल की, नोंदवहीतून काढून टाकण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव, विहित फी भरण्यात आल्यास त्यामध्ये पुन्हा दाखल करण्यात यावे :

परंतु, अशाप्रकारे नाव काढून टाकण्याविरुद्ध केलेले अपील राज्य शासनाकडून फेटाळण्यात आले असेल त्याबाबतीत या कलमाखालील आदेश, राज्य शासनाकडून तो कायम करण्यात येईपर्यंत परिणामक होणार नाही.

**अन्य अधिकारितेला आडकाठी.**

३८. नोंदवहीत नाव नोंदण्याचे नाकारणाऱ्या किंवा नोंदवहीतून नाव काढून टाकणाऱ्या कोणत्याही आदेशाला कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही.

**नोंदणी प्रमाणपत्रांची दुसरी प्रत देणे.**

३९. नोंदणी प्रमाणपत्र हरवले किंवा नष्ट झाले आहे अशी निबंधकाची खात्री करून देण्यात आली तर, विहित फी भरण्यात आल्यावर निबंधक, विहित नमुन्यात प्रमाणपत्राची दुसरी प्रत देऊ शकेल.

---

१. १९५९ चा अधिनियम २४-कलम १३ द्वारे घातले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. १९७६ चा अधिनियम ७०-कलम १८ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[1][ नोंदवहीची छपाई आणि त्यातील नोंदीचे पुरावा म्हणून महत्त्व. ]

[1][ ४०. (१) 'औषधव्यवसाय (विशोधन) अधिनियम, १९५९' (१९५९ चा २४) याच्या प्रारंभानंतरच्या १ एप्रिलनंतर होईल तितक्या लवकर निबंधक हा, नोंदवही उक्त दिनांकास जशी असेल त्याप्रमाणे तिच्या प्रती छापण्याची व्यवस्था करील.

(२) निबंधक त्यानंतर दरवर्षी १ एप्रिलनंतर होईल तितक्या लवकर, उक्त नोंदवहीतील जादा नोंदी व तीमधील अन्य विशोधने, दर्शवणाऱ्या पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या नोंदवहीच्या वार्षिक पुरवणीच्या प्रती छापण्याची व्यवस्था करील.

(३) (क) राज्य परिषदेच्या सर्वसाधारण निवडणुका होण्याच्या तीन महिने अगोदर नोंदवही अद्ययावत् करण्यात येईल आणि अशा नोंदवहीच्या प्रती छापण्यात येतील.

(ख) पोटकलम (२) चे उपबंध पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या नोंदवहीस ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे ते अशा प्रकारे छापलेल्या नोंदवहीस लागू होतील.

(४) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या प्रती, त्यांसाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तींना त्यांनी विहित आकार भरल्यानंतर उपलब्ध करून देण्यात येतील आणि त्या प्रती म्हणजे नोंदवहीत किंवा, प्रकरणपरत्वे, वार्षिक पुरवणीत निर्देशिलेल्या दिनांकी ज्यांचे नाव त्यात नोंदलेली असतील अशा व्यक्ती नोंदलेल्या औषधव्यवसायी होत्या याचा पुरावा असतील. ]

## प्रकरण ५वे

### संकीर्ण

नोंदणी झाली असल्याचा खोटा दावा करण्याबद्दल दंड.

४१. (१) जिचे नाव त्या त्या काळी राज्याच्या नोंदवहीत नोंदण्यात आलेले नसेल अशा कोणत्याही व्यक्तीने जर आपले नाव अशा प्रकारे नोंदण्यात आले आहे असा खोटा वहाणा केला अथवा नाव अशाप्रकारे नोंदण्यात आले आहे हे ज्यांच्यायोगे सूचित होण्याची वाजवी शक्यता आहे असे कोणतेही शब्द किंवा अक्षरे आपले नाव किंवा नामाभिधान यांच्या जोडीला वापरली तर, तो पहिल्या दोषसिद्धीअन्ती पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि तदनंतर कोणतीही दोषसिद्धी झाल्यास सहा महिन्यांच्या कारावासास, किंवा जास्तीत जास्त एक हजार रुपये इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल :

परंतु, आरोपीच्या नावाची अन्य राज्याच्या नोंदवहीत नोंद करण्यात आलेली आहे आणि या कलमाखालील अभिकथित अपराध घडण्याच्या वेळी राज्यात नोंदणी होण्यासाठी अर्ज करण्यात आला होता असे दाखवून देणे हा बचाव ठरेल.

(२) या कलमाच्या प्रयोजनांसाठी,—

(क) पूर्वोक्त अशा वहाण्यामुळे किंवा वापरामुळे कोणत्याही व्यक्तीची फसवणूक झाली नाही हे महत्त्वाचे नाही;

(ख) "औषधव्यवसायी", "औषधविक्रेता", "गंधी", "औषधनिर्माता", "औषधकार", "औषधकार विक्रेता" असे वर्णनपर शब्द अथवा अशा शब्दांची [1][ किंवा अशा कोणत्याही शब्दाची अन्य कोणत्याही शब्दाशी] होणारी कोणतीही संहती यांचा वापर करण्यात आला असता त्यावरून, अशा वर्णनपर शब्दांचा वापर करणारी व्यक्ती म्हणजे राज्याच्या नोंदवहीत नाव नोंदलेली व्यक्ती असावी असे सूचित होण्याची वाजवी शक्यता आहे असे मानले जाईल;

(ग) एखाद्या व्यक्तीच्या नावाची त्या त्या काळी राज्याच्या नोंदवहीत नोंद करण्यात आली आहे ही गोष्ट शाबीत करण्याचा भार, जो तसे प्रपादन करतो त्याच्यावर राहील.

(३) या कलमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाबाबत राज्य शासनाच्या किंवा [2][ राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या आदेशान्वये किंवा ] राज्य परिषदेच्या कार्यकारी समितीच्या आदेशान्वये तक्रार करण्यात आल्याखेरीज त्याची दखल घेतली जाणार नाही.

नोंदणी न झालेल्या व्यक्तींनी औषधे तयार करून देणे.

४२. (१) राज्य शासन याबाबतीत शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास किंवा त्यानंतर, नोंदलेल्या औषधव्यवसायीव्यतिरिक्त अन्य कोणालाही [3]* * * * वैद्यक व्यवसायीच्या औषधपत्रावरून कोणतेही औषधाचे संयुग करता येणार नाही, ते तयार करता येणार नाही, त्याचे मिश्रण करता येणार नाही किंवा ते तयार करून देता येणार नाही :

परंतु, एखाद्या वैद्यक व्यवसायीने स्वतःच्या रुग्णांकरता अथवा राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष मंजुरीने अन्य वैद्यक व्यवसायीच्या रुग्णांकरता औषध तयार करून देण्याच्या बाबतीत हे पोटकलम लागू होणार नाही :

---

१. १९५९ चा अधिनियम २४-कलम १४ द्वारे कलम ४० ऐवजी हे कलम घातले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम १५ द्वारे घातले. (१ मे, १९६० रोजी तेव्हापासून).

३. कित्ता—कलम १६ द्वारे गाळले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

[2][ परंतु आणखी असे की, राज्य शासनाने अशी कोणतीही तारीख नेमलेली नसेल त्याबाबतीत, त्या राज्यात हे पोटकलम "औषधव्यवसाय (सिशोधन) अधिनियम, १९७६' याच्या प्रारंभाच्या तारखेपासून पाच वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यावर अंमलात येईल.]

(२) जो कोणी पोटकलम (१) चे व्यतिक्रमण करील तो, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासास, किंवा जास्तीत जास्त एक हजार रुपये एवढ्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(३) या कलमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाबाबत [1][ राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या आदेशान्वये किंवा राज्य परिषदेच्या कार्यकारी समितीच्या आदेशान्वये ] तक्रार करण्यात आल्याखेरीज त्याची दखल घेतली जाणार नाही.

**नोंदणी प्रमाणपत्र स्वाधीन करण्यास चुकणे.**

४३. (१) जिचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्यात आले आहे अशी कोणतीही व्यक्ती आपले नोंदणी प्रमाणपत्र ताबडतोब स्वाधीन करण्यास पुरेशा कारणाविना चुकली तर, ती पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(२) या कलमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाबाबत कार्यकारी समितीच्या आदेशान्वये तक्रार करण्यात आल्याखेरीज त्याची दखल घेतली जाणार नाही.

**फीचा काही अंश केंद्रीय परिषदेस देणे.**

४४. प्रत्येक वर्षातील ३१ मार्च रोजी संपणाऱ्या बारा महिन्यांच्या कालावधीत, राज्य परिषदेने या अधिनियमाखाली वसूल केलेल्या एकूण फीच्या एकचतुर्थांश एवढी रक्कम राज्य परिषद त्या वर्षाच्या जूनअखेरीपूर्वी केंद्रीय परिषदेस देईल.

**चौकशी आयोगाची नियुक्ती.**

४५. (१) केंद्रीय परिषद या अधिनियमाच्या उपबंधांपैकी एखाद्या उपबंधाचे पालन करीत नाही असे जेव्हा जेव्हा केंद्र शासनाला दिसून येईल तेव्हा तेव्हा, केंद्र शासनाला तीन सदस्य मिळून बनलेला एक चौकशी आयोग नियुक्त करता येईल व त्यांपैकी एक सदस्य हा उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असून तो केंद्रीय शासनाने नियुक्त केलेला असेल आणि दुसरा सदस्य परिषदेने नियुक्त केलेला असेल, आणि ज्यांच्यासंबंधी चौकशी करावयाची आहे अशा बाबी केंद्र शासनाला त्यांच्याकडे निर्देशित करता येतील.

(२) आयोग, त्याला योग्य वाटेल अशा रीतीने चौकशी करण्यास सुरुवात करील आणि त्याच्याकडे निर्देशित केलेल्या बाबींवरील अहवाल व सोबत त्याला सुचवाव्याशा वाटतील अशा काही उपाययोजना असल्यास त्यासंबंधीच्या शिफारशी केंद्र शासनाकडे पाठवील.

(३) केंद्र शासनाला अहवाल स्वीकारता येईल अथवा आपरिवर्तनासाठी किंवा फेरविचारासाठी तो आयोगाकडे परत पाठविता येईल.

(४) अहवाल अंतिमरीत्या स्वीकारल्यानंतर केंद्र शासन असा आदेश देऊ शकेल की, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल इतक्या मुदतीत अशाप्रकारे शिफारस केलेल्या उपाययोजना केंद्रीय परिषदेने अंगीकाराव्यात आणि अशाप्रकारे विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत त्यांचे अनुपालन करण्यात परिषदेने कसूर केली तर, केंद्र शासन आयोगाच्या शिफारशी अंमलात आणण्यासाठी आवश्यक असेल असा आदेश काढू शकेल किंवा तशी कार्यवाही करू शकेल.

(५) राज्य परिषद या अधिनियमाच्या उपबंधांपैकी एखाद्या उपबंधाचे अनुपालन करीत नाही असे जेव्हा जेव्हा राज्य शासनाला दिसून येईल तेव्हा तेव्हा, राज्य शासन त्याच धर्तीवर त्यासारखाच एखादा चौकशी आयोग नियुक्त करू शकेल आणि पोटकलमे (३) व (४) यांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे तसा आदेश देऊ शकेल किंवा तशी कार्यवाही करू शकेल.

**नियम करण्याची शक्ती.**

४६. (१) ३ ऱ्या, ४ थ्या व ५ व्या प्रकरणांची प्रयोजने पार पाडण्यासाठी राज्य शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः व पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील गोष्टीं-करता उपबंध करता येतील :—

(क) राज्य परिषदेच्या संपत्तीची व्यवस्था पाहणे आणि तिचे हिशेब ठेवणे व लेखापरीक्षा करणे;

(ख) ३ ऱ्या प्रकरणाखाली निवडणुका कशा रीतीने घ्याव्या;

(ग) राज्य परिषदेच्या सभा बोलावणे व भरवणे, अशा सभा केव्हा व कोठे भरवाव्या त्या वेळा व ती ठिकाणे, त्यांमध्ये चालवावयाचे कामकाज आणि गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेली सदस्य-संख्या;

(घ) राज्य परिषदेचा सभापती व उप सभापती यांच्या शक्ती व कर्तव्ये;

(ङ) कार्यकारी समितीची घटना व तिची कार्ये, तिच्या सभा बोलावणे व भरवणे, अशा सभा केव्हा व कोठे भरवाव्या त्या वेळा व ती ठिकाणे, आणि गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेली सदस्य-संख्या;

---

१. १९५९ चा अधिनियम २४-कलम १६ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. १९७६ चा अधिनियम ७०-कलम १९ द्वारे जादा दाखल केले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(च) राज्य परिषदेचा निबंधक आणि अन्य अधिकारी व सेवक यांच्या अर्हता आणि पदावधी, त्यांच्या शक्ती व कर्तव्ये कोषाध्यक्षाने द्यावयाच्या प्रतिभूतीची रक्कम व स्वरूप यांसुद्धा.

[1] [ (चच्) निरीक्षकाच्या अर्हता, शक्ती व कर्तव्ये ]

(छ) ४ थ्या प्रकरणाखालील नोंदणी अर्जात नमूद करावयाचा तपशील व अर्हतांच्या संबंधात द्यावयाचा तपशील;

(ज) कलम ३२-पोटकलम (१) खालील नोंदणीच्या शर्ती;

(झ) ४ थ्या प्रकरणाखाली द्यावयाची फी आणि नोंदवहीच्या प्रती पुरवण्याबद्दल द्यावयाचा आकार;

(ञ) नोंदणी प्रमाणपत्रांचा नमुना [2] * * *;

(ट) नोंदवही ठेवणे;

[3] [ (टट्) औषधव्यवसायींचे वर्तन आणि वैद्यकव्यवसायी, जनता व औषधव्यवसाय या संबंधातील त्यांची कर्तव्ये ;]

(ठ) कलम ४५, पोटकलमे (१), (२), (३) व (४) खेरीजकरून प्रकरण ३ रे, ४ थे व ५ वे याखाली विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

---

१. १९५९ चा अधिनियम २४-कलम १७ द्वारे गाळले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).
२. कित्ता — कलम १७ द्वारे घातले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).
३. १९७६ चा अधिनियम ७०-कलम २० द्वारे घातले (१ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

## THE PHARMACY ACT, 1948

## औषधव्यवसाय अधिनियम, १९४८

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| annual supplement | वार्षिक पुरवणी | [S. 40(4)] |
| approved | मान्य | [S. 2 (b)] |
| Central Council | केंद्रीय परिषद | [S. 2 (d)] |
| Central Drugs Laboratory | केंद्रीय औषध प्रयोगशाळा | [S. 3 (e)] |
| chemist | औषधविक्रेता | [S. 41 (2) (b)] |
| Chief Chemist | मुख्य रसायनशास्त्रज्ञ | [S. 3 (f)] |
| civil disturbances | मुलकी दंगेधोपे | [S. 32A (3)-expl.1] |
| compound (medicine) | (औषधाचे) संयुग करणे | [S. 42 (1)] |
| course of study | पाठ्यक्रम | [S. 12 (1)] |
| direct the entry | नोंद करण्याचा निदेश देणे | [S. 30 (3)] |
| Director General, Health Services | महासंचालक, आरोग्य सेवा | [S. 3 (d)] |
| dispense (medicine) | (औषध) तयार करून देणे | [S. 42 (1)] |
| dispenser | औषधकार | [S. 41 (2) (b)] |
| dispensing chemist | औषधकार विक्रेता | [S. 41(2)(b)] |
| displaced person | विस्थापित व्यक्ती | [S. 32A(3)-expl.1] |
| druggist | गंधी | [S. 41 (2) (b)] |
| Drugs Controller, India | भारताचा औषधनियंत्रक | [S. 3 (dd)] |
| evidentiary value | पुरावा म्हणून महत्त्व | [S. 40-m.n.] |
| Executive Committee | कार्यकारी समिती | [S.2(e)] |
| furnish | पुरवणे | [S.10(3)] |
| Government Analyst | शासकीय विश्लेषक | [S.19(e)] |
| infamous conduct | गर्हणीय वर्तन | [S.36(1)(ii)] |
| Medical Council of India | भारतीय वैद्यकीय परिषद | [S.3(c)] |
| medical practitioner | वैद्यक व्यवसायी | [S.2(f)] |
| medical register | वैद्यकीय नोंदवही | [S.2(f)(ii)] |
| mix (medicine) | (औषधाचे) मिश्रण करणे | [S.42(1)] |
| name or title | नाव किंवा नामाभिधान | [S.41(1)] |
| nominate | नामनियुक्त करणे | [S.3(b)] |
| pharmaceutical chemistry | औषधरसायनशास्त्र | [S.3(a)] |
| pharmaceutical profession | औषधविषयक पेशा | [S.19(b)] |
| pharmaceutist | औषधनिर्माता | [S.41(2)(b)] |
| pharmacist | औषधव्यवसायी | [S.41(2)(b)] |
| pharmacognosy | औषधिगुणविद्या | [S.3(a)] |
| pharmacology | भेषजविज्ञान | [S.3(a)] |
| pharmacy | १. औषधव्यवसाय | [Short title)] |
| | २. औषधनिर्मितिशास्त्र | [S.3(a)] |
| | ३. औषधशास्त्र | [S.3(a)] |
| prepare (medicine) | (औषध) सिद्ध करणे | [S.42(1)] |
| profession and practice of pharmacy | औषधविषयक पेशा व व्यवसाय | [preamble] |
| profession or business of pharmacy | औषधविषयक पेशा किंवा धंदा | [S.2(i)] |
| re-election | फेरनिवडणूक | [S.5(2)] |
| register | नोंदवही | [S.2(i)] |
| registered pharmacist | नोंदलेला औषधव्यवसायी | [S.2(j)] |
| Registration Tribunal | नोंदणी अधिकरण | [S.30(1)] |
| re-nomination | पुनर्नामनियुक्ति | [S.7(6)] |
| State Council | राज्य परिषद | [S.2(h)] |
| submit | सादर करणे | [S.10(3)] |
| system of medicine | वैद्यक प्रणाली | [S.2(f)(ii)] |
| veterinary medicine | पशुवैद्यक | [S.2(f)(v)] |

# औषधव्यवसाय अधिनियम, १९४८

## *THE PHARMACY ACT, 1948*

### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| औषधकार | dispenser | [S.41(2)(*b*)] |
| औषधकार विक्रेता | dispensing chemist | [S.41(2)(*b*)] |
| औषधनिर्माता | pharmaceutist | [S.41(2)(*b*)] |
| औषधनिर्मितिशास्त्र | pharmacy | [S.3(*a*)] |
| औषध रसायनशास्त्र | pharmaceutical chemistry | [S.3(*a*)] |
| औषधविक्रेता | chemist | [S.41(2)(*b*)] |
| औषधविषयक पेशा | pharmaceutical profession | [S.19(*b*)] |
| औषधविषयक पेशा किंवा धंदा | profession or business of pharmacy | [S.2(*j*)] |
| औषधविषयक पेशा व व्यवसाय | profession and practice of pharmacy | (preamble) |
| औषधव्यवसाय | pharmacy | [Short title] |
| औषधव्यवसायी | pharmacist | [S.41(2)(*b*)] |
| औषधशास्त्र | pharmacy | [S.3(*a*)] |
| औषधिगुणविद्या | pharmacognosy | [S.3(*a*)] |
| कार्यकारी समिती | Executive Committee | [S.2(*e*)] |
| केंद्रीय औषध प्रयोगशाळा | Central Drugs Laboratory | [S.3(*e*)] |
| केंद्रीय परिषद | Central Council | [S.2(*d*)] |
| गंधी | druggist | [S.41(2)(*b*)] |
| गर्हणीय वर्तन | infamous conduct | [S.36(1)(*ii*)] |
| (औषध) तयार करून देणे | dispense (medicine) | [S.42(1)] |
| नामनियुक्त करणे | nominate | [S.3(*b*)] |
| नाव किंवा नामाभिधान | name or title | [S.41(1)] |
| नोंद करण्याचा निदेश देणे | direct the entry | [S.30(3)] |
| नोंदणी अधिकरण | Registration Tribunal | [S.30(1)] |
| नोंदलेला औषधव्यवसायी | registered pharmacist | [S.2(*j*)] |
| नोंदवही | register | [S.2(*i*)] |
| पाठ्यक्रम | course of study | [S.12(1)] |
| पशुवैद्यक | veterinary medicine | [S.2(*f*)(*v*)] |
| पुनर्नामनियुक्ती | re-nomination | [S.7(6)] |
| पुरावा म्हणून महत्व | evidentiary value | [S.40-m.n.] |
| पुरवणे | furnish | [S.10(3)] |
| फेरनिवडणूक | re-election | [S.5(2)] |
| भारताचा औषध नियंत्रक | Drugs Controller, India | [S.3(*dd*)] |
| भारतीय वैद्यकीय परिषद | Medical Council of India | [S.3(*c*)] |
| भेषजविज्ञान | pharmacology | [S.3(*a*)] |
| महासंचालक, आरोग्य सेवा | Director General, Health Services | [S.3(*d*)] |
| मान्य | approved | [S.2(*b*)] |
| (औषधाचे) मिश्रण करणे | mix (medicine) | [S.42(1)] |
| मुख्य रसायनशास्त्रज्ञ | Chief Chemist | [S.3(*f*)] |
| मुलकी दंगेधोपे | civil disturbances | [S.32A(3)-expl.1] |
| राज्य परिषद | State Council | [S.2(*h*)] |
| वार्षिक पुरवणी | annual supplement | [S.40(4)] |
| विस्थापित व्यक्ती | displaced person | [S.32A(3)-expl. 1] |
| वैद्यक प्रणाली | system of medicine | [S.2 (*f*)(*ii*)] |
| वैद्यक व्यवसायी | medical practitioner | [S.2(*f*)] |
| वैद्यकीय नोंदवही | medical register | [S. 2(*f*)(*I*)] |
| शासकीय विश्लेषक | Government Analyst | [S.19(*e*)] |
| (औषधाचे) संयुग करणे | compound (medicine) | [S.42(1)] |
| सादर करणे | submit | [S.10(3)] |
| (औषध) सिद्ध करणे | prepare (medicine) | [S.42(1)] |